मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगुज

अंक ४४ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● डिसेंबर २०००

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## कै. सुरेशभाऊ स्मृति निधी - आवाहन

मराठे प्रतिष्ठानचे संस्थापक व माजी अध्यक्ष कै. सुरेशभाऊ मराठे यांचे दि. ५ फेब्रुवारी २००० रोजी दुःखद निधन झाले.

मराठे प्रतिष्ठानच्या स्थापनेपासून कै. सुरेशभाऊंनी प्रतिष्ठानला सर्वतोपरी मदत केली. त्यांच्या प्रोत्साहनामुळे व मार्गदर्शनामुळे मराठे कुलवृत्तांत ग्रंथरूपात प्रसिद्ध होऊ शकला यात शंकाच नाही. केवळ कुलवृत्तांत प्रसिद्धीच नव्हे तर इतरही उपक्रम त्यांना अपेक्षित होते. म्हणूनच कुलवृत्तांत प्रसिद्ध झाल्यानंतर कृतकृत्य न होता मराठे कुलबांधवांनी एकत्र यावे. तरुणांना व्यवसायनिष्ठ बनवावे. हुशार व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत व मार्गदर्शन करावे. साहित्य, संगीत, नाट्याविष्कार, कथाकथन इत्यादी सांस्कृतिक क्षेत्रात कुलबांधवांनी यश प्राप्त करावे यासाठी निरनिराळे उपक्रम राबवावे हा त्यांच्या प्रयत्न होता.

**कै. सुरेशभाऊ यांची यथोचित स्मृति म्हणजे त्यांचे आवडते उपक्रम आपण पुढे चालू ठेवणे, हेच आहे.**

त्या दृष्टीने दि. ५ नोव्हेंबर २००० रोजी भरलेल्या मराठे प्रतिष्ठानच्या सर्वसाधारण सभेत कै. सुरेशभाऊ स्मृति निधी स्थापन करण्याचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात आला.

या निधीच्या व्याजातून प्रतिष्ठानच्या माध्यमातून वर्षातून एकदा तरी सांस्कृतिक कार्यक्रम कै. सुरेशभाऊंच्या स्मृतीदिनी (५ फेब्रुवारी) वा त्याच्या आसपास आखण्यात यावा अशी योजना आखण्यात आली आहे. हा उपक्रम पार पाडल्यानंतर जर निधीत पैसे उपलब्ध झाले तर त्यांचा विनियोग प्रतिष्ठानचे अधिवेशन, विभागीय मेळावे, कार्यकर्त्यांची चर्चासत्रे वा तत्सम कारणासाठी करावा असाही विचार आहे.

तरी सर्व मराठे **कुलबांधवांनी या योजनेला सक्रिय हातभार लावावा ही नम्र विनंती.**

देणगीचे चेक 'मराठे प्रतिष्ठान'च्या नावे द्यावे आणि पत्रामध्ये 'कै. सुरेशभाऊ स्मृतिनिधीसाठी देणगी' असा उल्लेख करावा.

हा निधी निदान रु. १० लाखापर्यंत व्हावा अशी अपेक्षा आहे. या दृष्टीने कुलबांधवांनी सढळ हाताने सहकार्य करावे ही विनंती.

आपला सहकारेच्छु,
**ग. वि. मराठे**
कार्योपाध्यक्ष, मराठे प्रतिष्ठान

## जाहीर निमंत्रण
### वर्धापन दिन समारंभ
### पुणे शाखा

मराठे प्रतिष्ठानचा २२वा वर्धापन दिन **शुक्रवार दिनांक २६ जानेवारी २००१** रोजी साजरा होणार आहे. या निमित्ताने कै. सुरेशभाऊंच्या स्मृतीला वंदन म्हणून तरुण व्यावसायिकांना मार्गदर्शन करण्यासाठी, काही 'यशस्वी व्यावसायिकांचे अनुभव कथन' असा कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरवले आहे.

तरी या कार्यक्रमास सर्व कुलबांधवांनी, मुख्यत्वे तरुणांनी, मित्र-मैत्रिणीसमवेत जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे व कार्यक्रमाची शोभा वाढवावी.

**कार्यक्रम विनामूल्य आहे.**

**-: स्थळ :-**
वेदशास्त्रोत्तेजक सभेचे सभागृह,
पेशवे पार्क चौक, विश्व हॉटेल समोर,
पुणे - ४११ ०३०

**-: वेळ :-**
सायंकाळी ४.३० ते ७.३०

**मराठे प्रतिष्ठान**

**पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)**
**मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.**

Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

## कार्यकारी मंडळ सभा

महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी सायंकाळी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा घेण्यात येते. तसेच चौथ्या शनिवारी गरजेनुसार कार्यकारी मंडळ आणि उपसमित्यांचे निमंत्रक यांची संयुक्त सभा घेण्यात येते. त्यामुळे उपसमित्या आणि कार्यकारी मंडळ यांचेमधे परस्पर संपर्काचे सातत्य रहायला मदत होते. कार्यकारी मंडळाच्या सभेच्या दिवशी ५ वाजता कोणीहि सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो.

मागील तिमाहीत ९ सप्टेंबर, १४ ऑक्टोबर आणि ११ नोव्हेंबर रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या. कार्यकारी मंडळ सदस्याशिवाय १४ ऑक्टोबरच्या सभेला विश्वस्त श्री. आनंद यशवंत (पृ. २७७) आणि ११ नोव्हेंबरच्या सभेला विश्वस्त श्री. अरविंद दामोदर (पृ. २९२) हेहि आवर्जून उपस्थित राहिले होते.

## वार्षिक सर्वसाधारण सभा

या तिमाहीतील विशेष म्हणजे ५ नोव्हेंबर २००० रोजी झालेली वार्षिक सर्वसाधारण सभा सभेला सुमारे ७० सभासद व विद्यार्थी उपस्थित होते. सभासदांनी प्रतिष्ठानच्या निरनिराळ्या कार्यक्रमाबद्दल आस्थेवाईकपणे आपले विचार मांडले. वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर १९९९-२००० मध्ये झालेल्या निरनिराळ्या स्पर्धा/परीक्षांत यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. यांबाबतचा तपशील पृ. ८वर पहावा.

## कै. सुरेशभाऊ स्मृति निधी

या वर्षीच्या सर्वसाधारण सभेचा विशेष म्हणजे मराठे प्रतिष्ठानअंतर्गत कै. सुरेशभाऊ स्मृति निधीची स्थापना. याबाबतचे आवाहन स्वतंत्रपणे याच अंकात प्रसिद्ध करण्यात आले आहे. कुलबांधवांचा या निधी संकलनाच्या कामी भरघोस प्रतिसाद मिळेल अशी आशा आहे.

## देणग्या

प्रतिष्ठानला एप्रिल ते नोव्हेंबर २००० या काळात मिळालेल्या देणग्यांचा तपशील खाली दिला आहे.

### कायम निधी

१. **अरुण गणेश,** **१,२००**
(पृ. २९०) बोरिवली, सालाबादप्रमाणे
वार्षिक देणगी

### वैद्यकीय मदत निधी

१. **सीताराम गोपाळ खांबेटे** **१०,०००**
(पृ. ६७६) अंधेरी, मुंबई-बंधु
कै. अशोक गोपाळ यांचे स्मरणार्थ

### शिक्षण निधी

१. **श्रीमती राधाबाई बाळकृष्ण** **५,०००**
(पृ. ५४१), गोव–आदर्श माता
पारितोषिकाची म.प्र.कडून मिळालेली
रक्कम म.प्र.च्या शिक्षण निधीला देणगी-
दिवंगत पति बाळकृष्ण विश्वनाथ
यांचे स्मरणार्थ

२. **विठ्ठल नारायण** **५,००१**
(पृ. २९१), नौपाडा, ठाणे
शैक्षणिक साहित्यासाठी

३. **डॉ. सुरेंद्रनाथ गणेश** **५०१**
(पृ. २८४), घाटकोपर मुंबई,
मुलगी सुप्रिया हिच्या विवाहाप्रीत्यर्थ

४. **रोहित माधव** **१००**
(पृ. २३५) दादर, मुंबई -गुणवत्ता
पारितोषिकाच्या 'स्व'कमाईमधून

५. **चिंतामण त्र्यंबक** **१००**
(पृ. २४८), कलवा, जि. ठाणे

६. **चिंतामण महादेव** **५०१**
(पृ. २२२), परळ, मुंबई-
कुलऋण विमोचनार्थ,
मातृ-पितृस्मृति देणगी

७. **सीताराम गोपाळ खांबेटे** **१०,०००**
(पृ. ६७६), अंधेरी, मुंबई-
वडील कै. गोपाळ मोरेश्वर
यांचे स्मरणार्थ

८. **श्रीमती जयश्री जगन्नाथ** **२०,०००**
(पृ. ३७१), ठाणे पति कै. जगन्नाथ
दामोदर यांचे तृतीय मासिक
स्मृतिदिनानिमित्त (२७.११.२०००)

### हितगुज निधी

१. **दत्तात्रय आत्माराम** **५१**
(पृ. ३२६), मुलुंड, मुंबई
भाऊबीजेनिमित्त सालाबादप्रमाणे

२. **हरि कृष्ण** **३५०**
(पृ. ४२७), वळगाव-गुणवत्ता
पारितोषिकाची रक्कम

### कै. सुरेशभाऊ स्मृति निधी

१. **मधुकर रामचंद्र चक्रदेव** **१,००१**
(पृ. ७२९) डोंबिवली

२. **अरविंद दामोदर** **१,००१**
(पृ. २९२), डोंबिवली

३. **सीताराम गोपाळ खांबेटे** **५,०००**
(पृ. ६७६), अंधेरी, मुंबई

४. **गणेश विनायक** **५,०००**
(पृ. ११५), मुंबई

## विशेष देणगी

एका विशेष देणगीचा या ठिकाणी मुद्दाम उल्लेख करायला हवा. ठाण्यामधील कुलभगिनी श्रीमती जयश्री जगन्नाथ मराठे (पृ. ३७१) यांनी त्यांच्या पतीच्या तृतीय मासिक स्मृतिदिनी (२७.११.२०००) प्रतिष्ठानच्या शिक्षण निधीला रु. २०,००० देणगी दिली. या रकमेच्या व्याजातून दरवर्षी ऑटोमोबाईल इंजिनियरिंगचे शिक्षण घेणाऱ्या (पदवी, पदविका अथवा आय टी आय) एका विद्यार्थ्याला त्यांचे पति जगन्नाथ दामोदर यांचे स्मरणार्थ शिष्यवृत्ती देण्यात आली अशी त्यांची इच्छा आहे. जगन्नाथ दामोदर यांना असे शिक्षण घेता आले नाही तरीहि त्यांनी स्वतःचा मोटर गॅरेजचा व्यवसाय यशस्वीपणे चालवला. या जाणीवेने, समाजऋण अंशतः तरी फेडण्याच्या दृष्टीने ही देणगी दिल्याबद्दल जयश्रीबाईंचे सर्व कुलबांधवांतर्फे अभिनंदन.

★★★

**Self-Improvement**

**Desire and Anger**
to come under their sway
is ignorance;
to rule over them
is perfection.



Marathe Pratishthan

# सभासद वृत्त

## 'ग्रंथमित्र' भाऊ मराठे


मराठे प्रतिष्ठनचे **सभासद सदानंद विष्णु तथा भाऊ मराठे (पृ. ५०७)** यांची कोकण मराठी साहित्य परिषदेतर्फे देण्यांत येणाऱ्या सत्यभामाबाई गाडगीळ ग्रंथमित्र पुरस्कारासाठी निवड झाली आहे. दोन हजार रुपये रोख आणि सन्मानपत्र असे या पुरस्कारचे स्वरूप आहे. १० डिसेंबर २००० रोजी कविवर्य केशवसुतांच्या मालगुंड या गावी हा पुरस्कार वितरण सोहळा व्हायचा आहे.

घरे रंगवण्याचा व्यवसाय करणारे भाऊ संगीत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करतांना आपल्या निवेदनातून इंद्रधनुष्याच्या सप्तरंगांची कशी उधळण करतात याचा अनुभव कुलबांधवांनी तीन वर्षांपूर्वी, रत्नागिरी संमेलनांत घेतला आहेच. 'सरीवर सरी' या द्विशतक महोत्सवा कडे घोडदौड करीत असलेल्या कार्यक्रमाच्या निवेदनामुळे महाराष्ट्रातल्या आणि महाराष्ट्राबाहेरच्याहि संगीतप्रेमी मंडळींना निवेदक/सूत्रसंचालक भाऊ मराठे परिचित आहेतच.

या पारितोषिकाच्या निमित्ताने त्यांचा 'ग्रंथमित्र' हा एक नवाच पैलू उजेडात आला आहे. याबाबत त्यांच्याशी बोललो असतां साडेसातशे ग्रंथ आणि २५-३० कात्रणसंग्रह त्यांच्याकडे असल्याचे त्यानी सांगितले.

भाऊंचा हा सन्मान सर्व मराठे परिवाराला खचितच अभिमानास्पद वाटतो. 'जागतिक' मराठे कुटुंबियांतर्फे भाऊंचे अभिनंदन आणि असे अनेकानेक सन्मान लाभो अशा शुभेच्छा.

## दानशूर ॲथलिट हरि कृष्ण




बंगलोर येथे २१ जुलै २०००मधे झालेल्या वयस्कांच्या राज्य पातळीवरील ॲथलेटिक स्पर्धेत प्रतिष्ठानचे **बेळगांव येथील सभासद हरि कृष्ण (पृ. ४२७)** यांनी गोळाफेकीत १ला, भालाफेकीत २रा तर थाळीफेकीत ३रा क्रमांक मिळवला. साहजिकच भोपाळ येथे सप्टेंबर २००० मधे झालेल्या वयस्कांच्या राष्ट्रीय स्पर्धेत भाग घेण्याऱ्या कर्नाटकाच्या संघातहि त्याची निवड झाली.

श्री. हरि कृष्ण यांचे वय आज ७३ वर्षे असून गेली अनेक वर्षे ते सातत्याने राज्य व राष्ट्रीय पातळीवरच्या स्पर्धेत बक्षिसें मिळवत असतात. एक विशेष म्हणजे प्रतिष्ठानतर्फे गुणवत्ता परितोषिकाची रक्कम त्यांनी हितगुज निधीला देणगी दिली आहे.

हरि कृष्ण यांना वयस्कांच्या जागतिक पातळीवरीलहि स्पर्धेत सहभागी होण्याचे भाग्य लाभो अशा सर्व कुलबांधवांतर्फे शुभेच्छा !

## सव्यसाची निखिल



महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळाने फेब्रुवारी २००० मध्ये घेतलेल्या पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षेत मुलुंड (प.) च्या वझे विद्यालयाचा विद्यार्थी **निखिल शंतनू (शंतनू अनंत यांचा मुलगा व अनंत सदाशिव, पृ. ३६४, यांचा नातू)** ३०० पैकी २६३ गुण मिळवून गुणवत्ता यादीत १३ वा आला.

निखिल हा मुलुंड जिमखान्याचा शिक्षणार्थी. जिमखान्याच्या स्पर्धेत त्याने 'बेस्ट जिमनॅस्ट'चा चषक मिळवला होता. तसेच पुणे येथे झालेल्या योगासनांच्या स्पर्धेत त्याला पहिले परितोषिक मिळाले होते.

सध्या निखिल हाँगकाँगच्या कॅनेडियन स्कूलमध्ये पाचव्या इयत्तेत शिकत आहे. सव्यसाची कामगिरीबद्दल मराठे परिवारातर्फे त्याचे अभिनंदन.

## अभिनेता आणि वक्ता शशांक श्रीधर

वेंगुर्ले येथील **सभासद, श्रीधर केशव (पृ. ३९६) यांचा बारावीत शिकणारा मुलगा शशांक** अभिनय आणि वक्तृत्व ही दोन्ही क्षेत्रे गाजवतो आहे.

१५ ऑगस्टला स्वातंत्र्यदिनादिवशी इनरव्हील क्लब, सावंतवाडीतर्फे खर्डेकर महाविद्यालयांत आयोजन केलेल्या वक्तृत्व स्पर्धेत महाविद्यालयीन गटात शशांकने प्रथम परितोषिक मिळवले. विषय होता 'मी एक भावी नागरिक'. (त्याचे हे विचार पुढील अंकात वाचावे - हो, तो विचार करणारा आहे. हितगुज डिसेंबर १९९९ मधील '[illegible]?' हा लेख याची साक्ष आहे.)

१ नोव्हेंबर २००० रोजी महाराष्ट्र [illegible] कल्याण मंडळाच्या विद्यमाने रंगभूमीदिनी वैयक्तिक अभिनय स्पर्धेचे आयोजन करण्यांत आले होते. संपूर्ण जिल्ह्यातल्या स्पर्धकांनी विविध नाटकातले प्रवेश सादर केले होतो. या स्पर्धेतहि शशांकने अभिनयाचे प्रथम पारितोषिक मिळवले.

मराठे परिवारातर्फे शशांकचे अभिनंदन

## नांदा सौख्यभरे

मुलुंड, मुंबई येथील सभासद, हितगुजचे **संपादक लक्ष्मण शंकर (पृ. ५२०) यांची मुलगी दीप्ती** हिचा विवाह अणुशक्तिनगर, मुंबई येथील के. आर. [illegible] यांचा मुलगा रमेश याचेशी मुंबईत २०.११.२००० रोजी झाला. चि. रमेश BARC मध्ये सायंटिफिक असिस्टंट म्हणून नोकरीत असून तोही दीप्तीप्रमाणे पीएच. डी करीत आहे.

## सेवानिवृत्ती

**गोव्यांतील सभासद गोविंद नारायण** (पृ. ५४१) हे ३१.८.२००० रोजी सरकारी प्राथमिक शिक्षक म्हणून ३७ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. गोव्याचे शिक्षणमंत्री प्रकाशराव फडते यांच्या हस्ते त्यांचा २९/९/२००० रोजी डिचोली येथे सत्कार करण्यात आला. तसेच पालक शिक्षक संघ व शिक्षक सहकारी सोसायटी यांचेतर्फेहि त्यांचे सत्कार झाले.

## सहवेदना

१. **मुलुंड, मुंबई येथील सभासद अरुण (मधुसूदन) दामोदर** (पृ. २९२) यांचे बुधवार दि. २२ मार्च २००० रोजी निधन झाले. ते ६० वर्षांचे होते.

२. **मुलुंड, मुंबई येथील सभासद यशवंत पुरुषोत्तम** (पृ. २९२) यांचे दि. २८ मे २००० रोजी वयाच्या ५९व्या वर्षी निधन झाले.

३. **बडोद्यातले सभासद रघुवीर विष्णु**



Marathe Pratishthan

(पृ. ४२२) यांच्या मातोश्री आनंदीबाई यांचे १६.१०.२००० रोजी वयाच्या ८७व्या वर्षी निधन झाले. लहानपणी खेळात व गोष्टी सांगण्यात त्यांनी बरीच बक्षिसे मिळवली होती. विशेष म्हणजे जुन्या काळच्या असूनहि त्या पोहण्यात व गाडी चालवण्यात निष्णात होत्या.

४. **कल्याण येथील कुलबांधव दत्तात्रेय परशराम (पृ. १७) यांची पत्नी लक्ष्मीबाई** यांचे २८.१०.२००० रोजी वृद्धापकाळामुळे निधन झाले. त्या ७८ वर्षांच्या होत्या.

५. **तुळस, जि. सिंधुदुर्ग येथील कुलबांधव श्रीराम चिंतामणि** (पृ. ५०३) ऊर्फ दाजी मराठे यांचे ३०.१०.२००० रोजी अल्प आजाराने निधन झाले. ते ६७ वर्षांचे होते.

**वरील सर्व मृतांच्या कुटुंबियांच्या दु:खात मराठे परिवार सहभागी आहे.**

★★★

# एकसष्टीचा अंत्यविधी !

- **गजानन चिंतामण,** (पृ. १२९), पुणे

अण्णासाहेब नुकतेच आयकर कार्यालयातून मुख्य आयुक्त म्हणून निवृत्त झाले होते. त्यांचा निवृत्ती समारंभ आयकर कार्यालयाने मोठ्या थाटात साजरा केला. ते कर्मचारी, अधिकारी, व सर्वसामान्य नागरिक व वकील वर्ग यांच्यात लोकप्रिय होते. अत्यंत गरीब कुटुंबात जन्म घेऊन स्वत:च्या कतृत्वाने ते आयकर कार्यालयात अव्वल कारकून म्हणून कामास लागले. इन्स्पेक्टर, आयकर अधिकारी, या परीक्षा प्रथम श्रेणीत पास झाले. इन्स्पेक्टर, आयकर अधिकारी, सहायक आयकर आयुक्त व मुख्य आयकर आयुक्त ह्या वरच्या जागा त्यांना मिळत गेल्या.

अण्णासाहेबांचे वयाच्या ३०व्या वर्षी लग्न झाले. बायको सुस्वभावी व मनमिळाऊ मिळाली. त्यांनी मुलांना व्यवस्थित शिक्षण दिले. मोठा मुलगा इंजिनियर झाला. धाकटा मुलगा डॉक्टर झाला. मुलगी वकील झाली. दोन्ही मुलगे परदेशात स्थायिक झाले. मुलगी दिल्लीला स्थायिक झाली. आता अण्णासाहेबांना एकटेपणा वाटू लागला म्हणून त्यांनी त्यांच्या घरी पेपर टाकणारा गिरीश यास मुलासारखे वाढवले. अण्णासोहबांना हृदयविकाराचा आजार होता व पत्नीस मधुमेहाचे दुखणे होते. वेळोवेळी हॉस्पीटलमध्ये दाखल करावे लागत होते. परंतु स्वत:चे मुलगे व मुलगी साधा फोन सुद्धा करत नव्हते.

अण्णासाहेबांनी स्वत:च्या कतृत्वावर बंगला बांधला होता. आर्थिक स्थिती उत्तम होती. स्वत:चे मृत्यूपत्र बनवून ठेवले होते.

एक दिवस एक ज्योतिषी त्यांच्या घरी आला. केवळ मजा म्हणून स्वत:ची पत्रिका त्यांना दाखवली. ज्योतिष्यांनी त्यांना त्यांचे भविष्य सांगितले की आपण स्वत:ची एकसष्टी साजरी करू नये. कारण आपणास ती लाभणार नाही. ही माहिती त्यांनी गुप्त ठेवली. स्वत:च्या पत्नीलाहि ही बातमी दिली नाही.

दोन्ही मुलगे व मुलगी यांनी आपल्या वडलांचा एकसष्टी समारंभ मोठ्या प्रमाणात करायचे ठरविले. एकसष्टी समारंभ साजरा करण्याकरता दोन्ही मुलगे मे महिन्यात भारतात येणार होते.

ठरल्याप्रमाणे १० मे रोजी दोन्ही मुलगे, मुलगी व जावई त्यांच्या घरी आले २५ मे रोजी घरी धार्मिक समारंभ आयोजित करत असल्याचे सांगितले. अण्णासाहेबांनी त्याला विरोध केला परंतु सर्वांच्या पुढे त्यांचे काहीच चालेना. सौ. नी विरोधाचे कारण विचारले परंतु त्यांनी सांगण्याचे नाकारले. तिला वाटले कदाचित मुले परदेशात रहातात व आपणाकडे लक्ष देत नाहीत म्हणून विरोध असेल.

दोन्ही मुलांनी स्वागत समारंभाची बोलावणी पूर्ण केली. स्वागत समारंभाकरता कार्यालय ठरवले. गुरुजींना धार्मिक विधी करण्याकरता ठरवले.

दि. २५ मे ला कार्यक्रम होता. आदल्या दिवशी सर्वजण कार्यालयांत गेले. अण्णासाहेबांच्या मित्रपरिवारांस बोलावणे केले. त्यांचे मित्र बाहेर गावाहून आले. त्यांचे सर्व नातेवाईक जमा झाले. रात्री भोजन व गप्पागोष्टी झाल्या.

अण्णा रात्री १२ वाजता झोपण्याकरता त्यांच्या खोलीत गेले. त्यांची पत्नी पण झोपण्याकरता गेली. सर्वजण झोपी गेले कारण सकाळी लवकर उठायचे होते.

सकाळले ६ वाजले. सर्वजण उठले. गुरुजी ८ वाजता येणार होते. सर्वजण आवराआवरी करण्याच्या गडबडीत होते. तसे खरेतर अण्णासाहेबांना पहाटे ५ वाजता उठायची सवय होती. परंतु सकाळचे ७ वाजले तरी अजून अण्णासाहेब उठले नव्हते म्हणून त्यांची पत्नी त्यांना हाक मारण्यास गेली. परंतु काहीच प्रतिसाद मिळेना.

अण्णासाहेब साद देईनात म्हणून डॉक्टरांना बोलावण्यात आले. डॉक्टरांनी येऊन त्यांना तपासले परंतु अण्णाचे पहाटेच देहावसान झाले होते. झोपेतच त्यांना हृदयविकाराचा झटका आला होता.

सर्व कार्यालयांत दु:खाची छाया पसरली. अण्णाच्या उशीखाली एक चिठ्ठी सापडली. त्यांत त्यांनी लिहिले होते ''जर यदाकदाचित उद्या मृत्यू आला तर पहिली बातमी माझे ज्योतिषी श्री. क्षीरसागर यांना द्यावी. त्यांनी मला एकसष्टी लाभणार नाही असे सांगितले होते. त्यांना त्यांचे भविष्य खरे ठरल्याबद्दल धन्यवाद द्यावे व बक्षीस म्हणून रु. १००१ द्यावे. तसेच माझ्या संपत्तीवर मुलांचा कोणताही हक्क नाही. ती मी माझ्या मानलेल्या मुलास, चि. गिरीश यास, दान केली आहे. तो त्याच्या आईची काळजी घेईल, याची मला खात्री आहे. मुलगे व मुलगी यांस घरात आल्यावर फक्त रहाण्याकरता जागा मिळेल. त्यांना कायमचे परदेशात रहावयाचे असल्यास माझा विरोध नाही.''

सर्वजण अन्त्यविधीच्या तयारीला लागले. असा साजरा झाला आण्णासाहेबांचा एकसष्टी समारंभ!

★★★

Marathe Pratishthan

# १८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तान्त

- **विनायक केशव** (पृ. २०) वरळी, मुंबई, कार्यवाह, मराठे प्रतिष्ठान

मराठे प्रतिष्ठानची १८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. ६ नोव्हेंबर २००० रोजी मराठे उद्योग भवन येथे आयोजित करण्यात आली होती. मराठे प्रतिष्ठानचे माजी अध्यक्ष कै. सुरेशभाऊ यांच्या दुःखद निधनानंतर भरलेली ही पहिलीच सभा होती. कै. सुरेशभाऊंच्या प्रसन्न व्यक्तिमत्वाची उणीव क्षणाक्षणाला भासत होती. कितीही लवकर सभास्थानी जाण्याचा प्रयत्न केला तरी आमच्या अगोदरच कै. सुरेशभाऊ तिथे उपस्थित असत व सभेच्या तयारी संदर्भात लोकांना सूचना देत असत. हे पाहून आमच्या मनाला चुटपूच लागे.



डावीकडून - विश्वस्त आनंदराव मराठे, कार्यवाह वि. के. मराठे, कार्योपाध्यक्ष ग. वि. मराठे

५ नोव्हेंबरला मी सभास्थानी आलो. पण कै. सुरेशभाऊ नव्हते. खुर्च्या आणून ठेवलेल्या होत्या, टेबल होते. टेबलक्लॉथ टेबलावर होता. सी. गो. नी आणलेली टपोरी गुलाबाची फुले टेबलावर ठेवली होती. सर्व काही होतं. पण आमचे सुरेशभाऊ नव्हते. का कुणास ठाऊक पण मन चटकन् निराश झालं. क्षणभर वाटलं आपण सामान्य माणसं. या सार्वजनिक संस्थेचा भार झेपेल का? कुलबांधवांचं प्रेम सुरेशभाऊंनंतर प्रतिष्ठानवर राहील का? सभेला इच्छित प्रतिसाद कुलबांधवांकडून मिळेल का? विचार करीत एक खुर्ची सरकवून बसलो आणि एका व्यक्तीने कै. सुरेशभाऊंचा फोटो टेबलावर ठेवला. फोटोकडे निरखून पाहिलं आणि विश्वास ठेवा वा ठेऊ नका. माझं सारं नैराश्य वितळून गेलं.

सभेला कुलबांधव हळू हळू जमू लागले. सभा सुरू करण्याइतपत उपस्थिती झाली. **श्री. ग. वि. मराठे प्रतिष्ठानचे कार्योपाध्यक्ष यांनी सर्वानुमते सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारले.**

अध्यक्षमहाशयानी कै. सुरेशभाऊंच्या प्रतिमेला पुष्पहार वाहिला. सर्व ज्ञात व अज्ञात मृत कुलबांधवांना दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली वाहण्यात आली.

कार्यवाह श्री. वि. के. मराठे यांनी उपस्थितांचे स्वागत केले व अध्यक्षांच्या अनुमतीने सभेला सुरवात करताना सभेची नोटीस वाचून दाखविली.

त्यानंतर मागील वार्षिक सभेचे इतिवृत्त, ताळेबंद व आयव्यय पत्रक व अहवाल सभेने सर्वानुमते संमत केला. तसेच मे. गोडसे मराठे, हिशेब तपासनीसाना पुढील वर्षासाठी प्रतिष्ठानचे हिशेब तपासनीस म्हणून नेमण्यात आले.

सभेचा हा काहीसा औपचारिक भाग पार पाडल्यानंतर प्रतिष्ठानचे **कार्यवाह श्री. वि. के. मराठे** यांनी एक प्रस्ताव सभेपुढे मंजुरीसाठी मांडला. **कै. सुरेशभाऊ स्मृति निधी या नावाने एक निधी मराठे प्रतिष्ठानच्या अंतर्गत स्थापन करण्यात यावा** व या निधीच्या देणग्यांच्या व्याजातून कै. सुरेशभाऊंच्या स्मृतिदिनाच्या आसपास सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन मराठे प्रतिष्ठानतर्फे करण्यात यावे. तसेच असे कार्यक्रम मुंबई व्यतिरिक्त अन्य ठिकाणी आयोजित करण्यात आल्यास निधीमध्ये रक्कम उपलब्ध असेल त्या प्रमाणे अशा कार्यक्रमांच्या खर्चाचाही काही भाग या निधीमधून भागवावा, अशा स्वरूपाचा हा प्रस्ताव होता. सदर प्रस्तावाला श्री. ग. वि. मराठे, प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष यांनी अनुमोदन दिले.

कै. सुरेशभाऊचे संगीत, साहित्य, कथाकथन यावरील असलेले प्रेम लक्षात येऊन आपण त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ काहीतरी करावे या विचाराने मी


डावीकडून - विश्वस्त अरविंदराव, सी. गो. खांबेटे, ल. शं. मराठे

प्रतिष्ठानच्या जेष्ठ कार्यकर्त्यांना माझी योजना सभास्थानी उपस्थित झाल्याबरोबर समजावून सांगितली

Marathe Pratishthan

होती. सर्वांनीच पाठिंबा दिला व त्याला अधिकृत स्वरूप येण्यासाठी सभेपुढे प्रस्ताव ठेवण्यात आला.



तल्लीन प्रेक्षकवर्ग - पुढील रांगेत डावीकडून सदानंद विष्णु, गजानन भास्कर आणि श्रीमती सुलभा सुरेश

उपस्थितांनी टाळयांच्या गजरात सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजूर केला.

विशेष उत्साहवर्धक गोष्ट म्हणजे सभेचे काम संपेपर्यंत पंधरा हजाराच्या देणग्या या निधीला जाहीर करण्यात आल्या. कै. सुरेशभाऊंच्या नुसत्या स्मृतीने सभेमधे नवचैतन्य प्राप्त झाले. मराठे प्रतिष्ठानचे कार्य उत्तरोत्तर वृध्दिंगत होत जाणार. मराठे कुलबांधवांना जीवनाच्या ऊन-पावसाच्या दिवसात तो जीवनदायी सावली देणारा महावटवृक्ष होणार असा शुभसंकेतच जणू या सभेने दिला असे म्हणणे अतिशयोक्तीचे होणार नाही.

या प्रस्तावाखेरीज उपस्थितांनी पुढील विचार प्रामुख्याने व्यक्त केले.

१) सभासदांच्या वाढदिवसाला प्रतिष्ठानतर्फे शुभेच्छापत्र पाठविले जावे. प्रतिष्ठानला जन्मतारखा पाठविण्याचे आवाहन हितगुजमध्ये करण्यात यावे.

२) प्रत्येक सभासदांने आपल्या जन्मदिनी प्रतिष्ठानला किमान रु. १०० एवढी देणगी द्यावी. **(सरोजिनी मराठे)**

३) पंचाहत्तर ते ऐंशी वयाच्या सभासदांचा प्रतिष्ठानच्या वार्षिक सभेत यथोचित सत्कार करण्यात यावा. **(सरोजिनी मराठे)**



तल्लीन प्रेक्षकवर्ग - पुढील रांगेत डावीकडून सौ. अनुराधा अरविंद, मा. ना. मराठे, डॉ. सुरेंद्रनाथ आणि तरुणांना लाजवणारा उत्साह, विष्णु मारुती - 'अवघे पंच्यांयशी वयमान'!

४) हितगुजमध्ये तरुणवर्गासाठी खास स्पर्धा ठेवावी. व या स्पर्धेत कमीत-कमी दहा स्पर्धक असावे. या सूचनेचे वैशिष्ठ्य म्हणजे सूचना करणारे कुलबंधु **श्री. गजानन भास्कर (घाटकोपर)** यांनी या स्पर्धेकरिता स्वतःची रु. १०००/- एवढी देणगी जाहीर केली.

५) प्रतिष्ठानची वार्षिक सभा व सांस्कृतिक कार्यक्रम मुंबई बाहेर ठेवावे. (विनीत चक्रदेव)

६) पारितोषिकांसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत संबंधित विद्यार्थ्यांनी स्वतःचे हस्ताक्षरात अर्ज करावा. नुसते गुणपत्रक वा पालकांनी अर्ज करू नये. मुंबई व कल्याण-बोरीवली परिसरापर्यंत राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्वतः पारितोषिक वितरण समारंभाला उपस्थित रहावे. अडचण असल्यास प्रतिष्ठानला अगोदर तसे कळवावे. विद्यार्थ्यांचा प्रतिष्ठानशी प्रत्यक्ष संपर्क रहावा व इतर उपस्थित विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे हा या सूचनेमागे हेतू आहे. पारितोषिक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी सभासद व्हावे. योग्य तो प्रतिसाद मिळाल्यास सभास्थानी अचानक स्पर्धा आयोजित करता येतील. शिक्षण समितीचे निमंत्रक **डॉ. सुरेंद्रनाथ मराठे** यांनी वरील विचार व्यक्त केले.

७) कै. सुरेशभाऊ स्मृतिनिधींच्या वतीने होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमात उद्योजकांचा सत्कार करण्यात यावा. **(सुधाकर मराठे)**

८) हितगुज समितीचे निमंत्रक व **हितगुजचे संपादक श्री. ल. शं. मराठे** यांनी तरुणानी हितगुजचा तरुणाई या नावाचा खास अंक काढण्यासाठी पुढे यावे अशी विधायक सूचना केली. पुरेसे कार्यालयीन बळ नसल्यामुळे प्रत्येक सभासदाच्या वाढदिवशी शुभेच्छा पत्र पाठविणे कठीण होईल असाही खुलासा त्यांनी केला.

९) श्री. हेमंत मराठे उद्योग-प्रेरणा उपसमितीचे निमंत्रक यांच्या गैरहजेरीत श्री. वि. के. मराठे यांनी या उपक्रमाला तरुणांचा बिलकुल प्रतिसाद मिळत नसल्याबद्दल खेद व्यक्त केला. याबाबतीत पुन्हा एकदा प्रयत्न करण्याचे आश्वासन त्यांनी प्रतिष्ठानतर्फे दिले.


१०) परळ येथील प्रतिष्ठानचे सभासद **चिं. म. मराठे** यांनी मराठे प्रतिष्ठानला रु. ५०० एवढी देणगी जाहीर करताना कार्यवाह वि. के. च्या आग्रहावरून पुढील विचार व्यक्त केले.

''प्रत्येक माणसाला पितृऋण, मातृऋण यासारखे कुलऋणसुध्दा असते पण त्यांनी ते जाणून घेतले पाहिजे. माझ्या आईच्या आणि पत्नीच्या निधनानंतर नसती कर्मकांडं करीत न बसता मी



Marathe Pratishthan


## प्रतिष्ठानच्या कार्याबाबत अहमहमिकेने आपापले विचार मांडताना




डॉ. सुरेंद्रनाथ




सुधाकर नरहर



चिंतामणराव



ज. गो. मराठे



वा. ग. मराठे

माझ्या कुवतीप्रमाणे सेवाभावी संस्थांना थोडीफार मदत केली. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त आज देणगी देताना सुध्दा माझा हाच मानस आहे.''

श्री. वि. के. मराठे यांनी श्री. चिंतामण राव यांच्या विचारांना आणि आचारांना संपूर्ण पाठिंबा दाखविला व चिंतामणरावांनी विज्ञाननिष्ठ हिंदूसमाजाचा आदर्श घालून देताना जो निर्भयपणा दाखवला त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. श्री. चिंतामणराव हे पुण्यातील अनाथ विद्यार्थीगृहाचे विद्यार्थी. आयुष्यभर नाना संकटांशी झुंज देत ते ध्येयवादी आयुष्य जगत आहेत व अशा कुलबांधवांचा प्रतिष्ठानला अभिमान वाटतो असा साऱ्या उपस्थितांच्या मनातील प्रतिसादच त्यांनी बोलून दाखविला.

११) प्रतिष्ठानचे **विश्वस्त श्री. अरविंद दा. मराठे** यांनी तरुणवर्गाला आकर्षित करण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील राहिले पाहिजे, निरनिराळे लहान मोठे उपक्रम राबवले पाहिजेत असे मार्गदर्शनपर विचार व्यक्त केले.

१२) **श्री. गुणाकर मराठे** या प्रतिष्ठानच्या डोंबिवली येथील सभासदांनी त्यांच्या मुलाच्या उद्योगासंदर्भात श्री. अरविंदराव मराठे यांचे बहुमोल सहकार्य लाभले याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला.

१३) **ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. ज. गो. मराठे** यांनी सभेला ध्वनिवर्धकाची सोय असावी असे सांगत असताना कुलबांधवांशी पत्रव्यवहार केल्यावर त्याला प्रतिसाद मिळत नाही अशी खंत व्यक्त केली. विरार येथे विभागीय मेळावा भरविण्याची तयारी त्यांनी दाखविली.

सभेच्या अध्यक्षानी **समारोपाचे भाषण करताना** उपस्थितांनी मोकळेपणाने विचार मांडले याबद्दल आनंद व्यक्त केला. 'उद्योग-प्रेरणा' या उपक्रमाला मिळणाऱ्या अल्प प्रतिसादाची खंत कै. सुरेशभाऊंना फार लागून राहिली होती. तरीहि निराश न होता प्रतिष्ठान पुन्हा नव्या उमेदीने प्रयत्न करील, त्याना सर्व कुलबांधवांनी पाठिंबा द्यावा. त्यांच्या घरातील तरुणांना प्रतिष्ठानच्या कार्यात सहभाग घेण्यास प्रोत्साहन द्यावे, कै. सुरेशभाऊ स्मृति निधीला सर्वांनी सक्रिय हातभार लावावा, प्रतिष्ठानच्या प्रत्येक कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, अशी विनंती आपले समारोपाचे भाषण संपविताना अध्यक्षांनी केली.

**श्री. वा. ग. मराठे (नेरूळ),** प्रतिष्ठानचे संस्थापक सभासद यांनी उपस्थितांचे आभार मानताना आपला उध्दार आपल्यालाच केला पाहिजे. मराठे प्रतिष्ठान हे ज्येष्ठ कुलबांधवांना पित्याच्या स्थानी आहे तर तरुण वर्गाला आजोबांच्या स्थानी आहे याची जाणीव करून देत प्रतिष्ठानचा सन्मान हा पर्यायाने आपला सन्मान आहे, प्रतिष्ठानचे यश-अपयश हे आपले यश-अपयश आहे याची आठवण करून दिली. कै. सुरेशभाऊ यांच्या मनातले मराठे प्रतिष्ठान आम्ही साकार करूच या निर्धाराने सर्वजण घरी परतले.

★★★

स्मरण पूर्वजांचे

### वाईच्या प्राज्ञ पाठशाळेचे संस्थापक, परिवर्तनवादी पंडित

## नारायण सदाशिव ऊर्फ केवलानंद सरस्वतीस्वामी (१८७७-१९५५)

धर्माची आज्ञा म्हणजे काळ्या दगडावरची रेघ. त्यात कधीही बदल होणे शक्य नाही. जो कोणी बदल करू पाहील तो पाखंडी समजावा. अशी सर्वसाधारण समजूत असते. म्हणून त्यात किंचितसा बदल करू पाहणाऱ्यांनाही खूप हाल सोसावे लागले. परंतु धर्म हा काळाप्रमाणे बदलत राहिला पाहिजे, तो परिवर्तनशील असला पाहिजे, असा विचार मांडणारे नारायणशास्त्री मराठे हे महाराष्ट्रातील पहिले परिवर्तनवादी प्रकांडपंडित!


वाई येथे स्वामी प्रज्ञानंद सरस्वती यांच्याकडे वेदान्त आणि प्राचीन शास्त्रे यांचे अध्ययन झाल्यावर नारायणशास्त्री (नारायण सदाशिव, पृ. ९३) यांनी अर्वाचीन काळातील इतिहास आणि शास्त्रीय वाङ्मय यांचाही अभ्यास केला. त्यामुळे समाजाची घडी नीट बसवायची असेल तर धर्म सदैव परिवर्तनशील असला पाहिजे, अशी त्यांची धारणा झाली. अस्पृश्यता नष्ट करणे, विधवा विवाहास उत्तेजन देणे अशा सुधारणा आजच्या काळाला धरून आहेत असे त्यांनी प्रतिपादिले. नारायणशास्त्री यांनी स्वधर्म आणि स्वसंस्कृती यावर निष्ठा ठेवून समाजाचे परिवर्तन करू शकणारे कर्तबगार विद्यार्थी तयार करण्यासाठी वाई येथे प्राज्ञ पाठशाळेची स्थापना केली. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, महादेवशास्त्री दिवेकर, दिनकरशास्त्री कानडे, रघुनाथशास्त्री कोकजे हे त्यांचे काही विद्यार्थी!

या सर्वांनी मिळून महाराष्ट्रातील नवीन

*पृष्ठ १३ वर*



Marathe Pratishthan




# गुणवंतांच्या पाठीवर कौतुकाची थाप
# मराठे प्रतिष्ठान-गुणवत्ता पारितोषिके १९९९ - २०००

दहावी, बारावी, पदविका, पदवी व पदव्युत्तर परीक्षा, तसेच विज्ञान, गणित, स्कॉलरशिप वा व्यावसायिक स्पर्धा-परीक्षा यांमधील गुणवत्ता धारक आणि क्रीडा, संगीत, नाट्य, अभिनय इ. अभ्यासेत्तर क्षेत्रांत किमान जिल्हा स्तरावर विशेष नैपुण्य मिळवणारे कुलबांधव यांना गुणवत्ता पारितोषिके दिली जातात.

५ नोव्हेंबरला वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर मुंबईतील रेडिओ इलेक्ट्रीक इन्स्टिट्यूट या तांत्रिक शिक्षण देणाऱ्या भारतातील पहिल्या संस्थेच्या माजी संचालिका श्रीमती शालिनीबाई मराठे यांच्या हस्ते गुणवंतांना पारितोषिके देण्यात आली.


१९९९ - २००० या वर्षात निरनिराळ्या स्पर्धा-परीक्षात गुणवत्ताप्राप्त कुळबांधवांची माहिती खालीलप्रमाणे. (यापैकी अतिविशेष यश मिळवणाऱ्याची माहिती मागील, म्हणजे सप्टेंबरच्या हितगुजमध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे.)

## अ) माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी)

| | नांव (पृ. क्र.) गाव | गुण (%) | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १) | **नेहा उदय खांबेटे** (७००), श्रीरामपूर | ९१.२०% | ५०० |
| | (कोचिंग क्लास न लावता, स्वाध्याय मालेचे सहाय्य घेऊन स्वतः अभ्यास करून बोर्डात १३वी, नगर-जिल्ह्यांत २री) | | +२५०★ |
| २) | **प्रियरंजन आनंद** (११५), गोवा | ९०.९३% | ५०० |
| | (गोवा बोर्डात ९वा) | | |
| ३) | **सुप्रिया राजेंद्र**, (२९१), मुंबई | ८९.४७% | ३०० |
| ४) | **मेघना उमेश** (१३४), मुंबई | ८९.३३% | ३०० |
| ५) | **मकरंद मधुकर** (५३८), गोवा | ८८.२७% | ३०० |
| | (गोवा बोर्डात ४८वा) | | + १००● |
| ६) | **दिलीप सुरेश** (२१८), गोवा | ८८.००% | ३०० |
| ७) | **अवंती श्रीनिवास** (३८९), मुंबई | ८६.००% | ३०० |
| ८) | **राहूल मोरेश्वर विद्वांस** (६६४), लोणावळा | ८०.६७% | २५० |
| ९) | **हर्षद विवेक** (२२३), वाई | ७९.६०% | २०० |
| १०) | **नेहा नीळकंठ** (१६०), मुंबई | ७९.४७% | २०० |
| ११) | **योगिनी मुरलीधर** (२९२), मुंबई | ७५.८७% | २०० |
| १२) | **जयंती जयंत घाटे** (३२६), मुंबई | ७४.५३% | १५० |
| १३) | **विनीत विनायक** (१५८), मुंबई | ७०.२७% | १५० |

## ब) उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (१२वी)


| | नांव (पृ. क्र.) गाव | गुण (%) | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १) | **माणिक नरसिंह चंद्रचूड** (४७६), पुणे | ९२.६७% | ५०० |
| | | | +२५०★ |
| २) | **अजित अशोक** (१८८), गोवा | ८६.६७% | ३५० |
| ३) | **रश्मी श्रीकांत काळे** (३२६), मुंबई | ८६.५०% | ३५० |
| ४) | **रोहित माधव** (२३५), मुंबई | ८२.३३% | ३०० |
| | | | + ५००■ |
| ५) | **श्रुती सुधाकर** (९०), मुंबई | ७९.१७% | ३०० |
| ६) | **वैदेही दिलीप** (४०८), मुंबई | ७९.१७% | ३०० |
| ७) | **सुचित्रा उमेश** (१३४), मुंबई | ७५.६७% | ३०० |
| ८) | **सानिका जयंत घाटे** (३२६), मुंबई | ७२.१७% | ३०० |
| ९) | **प्रसाद विश्वनाथ** (५३८), गोवा | ७१.६७% | २५० |
| १०) | **केतकी अनंत** (४००), मुंबई | ६९.००% | १५० |
| ११) | **कौस्तुभ कमलाकर** (४९), देवगड | ६३.१७% | १५० |



शालिनीबाईंच्या हस्ते पारितोषिके स्वीकारताना अनुक्रमे - विनित विनायक, श्रुती सुधाकर, सुकृत विनायक खांबेटे, देवयानी बळवंत विद्वांस, वैदेही दिलीप आणि प्रीता करमरकर

Marathe Pratishthan

शालिनीबाईंच्या हस्ते पारितोषिके स्वीकारताना



डावीकडून अनुक्रमे - केतकी अनंत, आशुतोष उपेंद्र, रोहित माधव, अवंती श्रीनिवास, सुप्रिया राजेंद्र आणि ऋता करमरकर

## क) पदविका/पदवी/उच्च पदवी

१) **अमित शरच्चंद्र** (४००), मुंबई B.Sc. ७०.७५% ३५०

२) **देवयानी बळवंत विद्वांस** (६४५), मुंबई B.Com. ६४.००% ३००

३) **आशुतोष उपेंद्र** (४००), मुंबई B.E. ६३.०७% ३००

४) **गौरव मोरेश्वर विद्वांस** (६६४), लोणावळा D.P.T. ६८.३९% २५०

## ड) अन्य स्पर्धा/परीक्षा

१) **प्रीता संजय करमरकर** (लक्ष्मण शंकर, ५२० यांची नात), बदलापूर इ. ४थी स्कॉलरशिप — ९२.६७% राज्यात ४थी — १५० +२५०*

२) **ऋता संजय करमरकर** (लक्ष्मण शंकर, ५२० यांची नात), बदलापूर मुंबई विज्ञान अध्यापक संघाची डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षा (इ. ६वी) — ठाणे जिल्ह्यांत रौप्य पदक — २५०

३) **सुकृत विनायक खांबेटे** (६९४), मुंबई इ. ७वी स्कॉलरशिप — 85.67% मुंबईत १८वा — १५० +२५०*

४) **केतकी जयंत** (२३९), मुंबई इ. ७वी स्कॉलरशिप — ७४.००% — १५०

५) **ऋचा मिलिंद** (३३१), मुंबई, चितोडगड (राजस्थान) व गुणा (म.प्र. येथील बास्केटबॉलच्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व) — ५००

६) **हरी कृष्ण** (५२७), बेळगांव, वयस्काच्या बंगलोर मधील राज्य ॲथलेटिक स्पर्धा आणि भोपाळ येथील राष्ट्रीय स्पर्धेत कर्नाटकाचे प्रतिनिधित्व — ३५०

★ **कै. कु. अमिता खांबेटे पारितोषिक** - इयत्ता १०वी, १२वी आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (इ. ४थी) व माध्यमिक शिष्यवृत्ती (इ. ७वी) या परीक्षांत मराठे परिवारात सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल.

● इ. १०वी ला १०० मार्कांच्या हिंदी विषयात मराठे परिवारात सर्वाधिक गुण (८२) मिळविल्याबद्दल **सौ. सुलभा अनंत प्रायोजित पारितोषिक.**

■ तांत्रिक विषय घेऊन (व्होकेशनल) १०वी च्या परीक्षेत मराठे परिवारात सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल **प्रभाकर गणेश प्रायोजित पारितोषिक.**

## जिद्द

- **विजय अनंत** (पृ. १५५), पुणे

**माणसाच्या अंगात जिद्द असेल तर तो कधीही मागे रहात नाही. मेहनत करण्याची व शिकण्याची आवड मात्र पाहिजे जेव्हा गॅझेटेड ऑफिसर झालो तेव्हा मला हिमालय सर केल्याचा आनंद झाला.**

मी ८ वर्षाचा असताना माझे वडील स्वर्गवासी झाले (१९३०). त्या पूर्वी आम्ही रत्नागिरीला वडिलांची खानावळ असताना खूप आनंदात होतो, पण वडील स्वर्गवासी झाले आणि आम्ही ''राजाचे रंक'' झालो. कोकणातील भाऊबंदकी हेच कारण. वडील वारले तेव्हा मी, माझा एक भाऊ (वय १०), बहीण (वय ५) व सर्वात लहान भाऊ (वय ५ महिने) अशा परिस्थितीत आम्हाला घर-दार, शेतीवाडी ह्या सर्वच गोष्टींना विसरावे लागले. आम्ही पावस मुक्कामी एका घरात राहू लागलो. निवारा मिळाला; पण दुपारची वेळ कशी भागवणार?

आमची आई फारच जिद्दीची होती. तिने कोणापुढे हात पसरला नाही. आम्ही दोघा भावांनी पावस मुक्कामी ''ॐ भवती'' सुरू केली. जे मिळेल त्यात वेळ भागवायची व पाणी पिऊन दिवस काढायचे. त्यानंतर साधारण २ वर्षांनी मी पुण्याला शिक्षणासाठी आलो. पडेल ते काम करून शिक्षण घेत होतो. इंग्रजी ४थी (हल्लीची आठवी) पर्यंत शिक्षण घेतले. पुढे शिक्षणाची आवड असून जमले नाही. आता काही तरी व्यवसाय करावा म्हणून मोटारी धुणे, सर्व्हिसिंग करणे सुरू केले. ड्रायव्हिंग शिकलो. पण त्यात मन रमेना.

एके दिवशी फिरत असताना एक गृहस्थ भेटले. त्यांचे नाव कै. बाबूराव परदेशी. ते उत्तम



Marathe Pratishthan

मेकॅनिक होते. त्यांना मी काम शिकविण्याची विनंती केली तेव्हा ते म्हणाले, काम अवघड आहे आणि तू लहान आहेस. तेव्हा मी त्यांना विनंती केली, ''मी तुमच्या बरोबर काम करीन. तुम्हाला योग्य वाटले तर मला शिकवा.'' त्याप्रमाणे मी काम सुरू केले. पुढे ४-५ दिवस गेल्यावर त्यांनी मला बोलावले व एके ठिकाणी रात्रपाळी करून एका मोटारीचे इंजिन उघडण्यास सांगितले. मी एकट्याने एक आण्याची भेळ खाऊन रात्रभर जागून काम पूर्ण केले. दुसरे दिवशी कै. बाबूरावांनी मला कम पाहून १ रुपया दिला. मला स्वतःच्या कमाईचा रुपया हातात पडल्यावर खूप आनंद झाला. पुढे मी त्यांच्याबरोबर काम करू लागलो. आणि त्यांनी पण मला मनापासून शिकवले.

१९४२ साली खडकीला संरक्षण खात्यांत मेकॅनिक म्हणून १-२५ पैसे रोज ह्याप्रमाणे नोकरी मिळाली. जास्त काम केले तर जास्त पैसे मिळत असत. पहिल्याच महिन्याला मला ६० रु. पगार मिळाला. त्या दिवशी खूपच आनंदात होतो. ''मन सुद्ध तुझं गोष्ट आहे पृथ्वी मोलाची, तू चाल पुढं तुला रं गड्या भीती कशाची'' ह्या गाण्याप्रमाणे वाटचाल केली. पुढे खडकीला ''रणगाडा'' विभाग सुरू झाला व माझी बदली त्या विभागात झाली. नवीन काम, गोरे साहेब, त्यांची इंग्रजी भाषा ही एक तारेवरची कसरत होती. गोरा असला तरी तो माणूसच असतो ही गोष्ट मला मेजर ब्राऊन ह्यांचे कडून चांगलीच समजली. त्यांचे व माझे छान जमले. त्यांनी खूप कष्ट घेऊन मला प्रत्येक रणगाड्याची माहिती, ड्रायव्हिंग शिकवले. त्याचा मला खूप फायदा झाला. मी ५ रु. रोजावर पोचलो.

१९५२ साली बाहेरून शिकून एस.एस.सी. झालो. मला पुढे शिकण्याची इच्छा होती तेव्हा माझी बदली दिल्लीला 'अे' व्हीकल डेपोत झाली. अशाच बदल्या होत गेल्या व शेवटची ९ वर्षे मी गॅझेटेड ऑफिसर म्हणून काम केले व ३१.१२.१९७९ रोजी सेवा निवृत्त झालो.

माणसाच्या अंगात जिद्द असेल तर तो कधीही मागे राहात नाही. मेहनत करण्याची व शिकण्याची आवड मात्र पाहिजे. मी ज्यावेळी गॅझेटेड ऑफिसर झालो तेव्हा मला हिमालय सर केल्याचा आनंद झाला. एकच गोष्टीचे वाईट वाटते हा माझा उत्कर्ष पाहायला ज्या माझ्या आईने रक्ताचे पाणी केले ती हयात नव्हती आणि पत्नी पण मी सेवा निवृत्त होण्याआधी २५.१२.१९७९ रोजी स्वर्गवासी झाली.

मला दोन मुलगे व एक मुलगी आहे. मोठा मुलगा लोणीला (पुण्याजवळ) एका कंपनीत आहे व धाकटा रेल्वे मध्ये इंजिन ड्रायव्हर आहे. माझे जावई कमांडर कै. गजानन अभ्यंकर हे सुध्दा जिद्दीनेच कमांडरच्या जागेपर्यंत गेले. ('हितगुज' जून १९९९ मधील यांचा लेख पहावा - संपादक) आता मी १२.१२.२००० रोजी ८०व्या वर्षात पदार्पण करणार. परमेश्वराची कृपा व मराठे परिवाराच्या शुभेच्छा. अजून तरी माझी प्रकृती उत्तम आहे. ''कर्मण्येवाधिकारस्ते'' या सूत्राप्रमाणे मी सुखात आहे.

★★★

# गीताधर्म मंडळ, पुणे यांचा विविधा गीता प्रकल्प

भगवान श्रीकृष्णाचे चरित्र प्रातःस्मरणीय आहे. भगवान श्रीकृष्ण म्हणजे भारतीय संस्कृतीचा आत्मा. या अवतारी महापुरुषाच्या अलौकिक चरित्राचे सार म्हणजे गीता. गीतेचे श्रेष्ठ तत्त्वज्ञान समाजात रुजवून, राष्ट्रभक्तीने रसरसलेले कर्मयोगी निर्माण करण्याच्या हेतूने १९२४ साली 'गीताधर्म मंडळ, पुणे', या संस्थेची स्थापना गीतावाचस्पती सदाशिवशास्त्री भिडे आणि लोकमान्यांचे नातू श्री. ग. वि. केतकर यांनी केसरी वाडयात केली.

मंडळाचे मुखपत्र म्हणून प्रसिद्ध होत असलेले 'गीतादर्शन' मासिक गेली तीस वर्षे अखंडपणे चालू आहे.

या मासिकाच्या रौप्यमहोत्सवी वर्षात दहा विशेषांक काढण्यात आले. त्यापैकी 'गीत रत्नमाला' या विशेषांकाचे लेखक श्री. आत्मारामपंत वझे यांच्या सहकार्याने, मंडळाने 'विविधा गीता प्रकल्प' हाती घेतला आहे.

समर्थ रामदासांच्या 'ग्रंथराज दासबोधांमध्ये बारा विविध गीतांचा उल्लेख आढळतो, तर लोकमान्य टिळकांनी 'गीतारहस्य' या आपल्या ग्रंथात सव्वीस विविध गीतांचा उल्लेख केलेला आहे. मद्रास महाविद्यालयाचे डॉ. व्ही. राघवन यांनी 'संस्कृत अॅकेडमी', मद्रास येथे जानेवारी, १९३८ मध्ये 'गीता जयंती' च्या निमित्ताने 'ग्रेटर गीता' या शीर्षकाचा एक निबंध वाचला; त्यांत त्यांनी एकशे दहा विविध गीतांची यादी दिली आहे. त्या निबंधाच्या आधारे विविध ग्रंथसंग्रहालयाशी संपर्क साधून निरनिराळ्या ९५ विविध गीतांच्या संहिता मिळविल्या आहेत. इतर 'गीता' मिळविण्याचे प्रयत्न चालू आहेत.

उपलब्ध झालेल्या आणि पुढे मिळणाऱ्या सर्व गीता, मंडळाने १२ खंडात करण्याचे ठरविले आहे. प्रत्येक खंडात गीतेची ओळख. (कोणी-कोणाला सांगितली), विषयानुक्रमणिका (आवश्यक असेल तेथे), मूळ ग्रंथ संदर्भ (उपलब्ध असेल तर), संस्कृत संहिता व अर्थ - (महाभारतातील गीता भांडारकर प्राच्य संस्थेची संशोधित आवृत्तीप्रमाणे) आणि कठीण शब्दांच्या अर्थाची सूची,

विविध गीता असलेले मूळ संस्कृत ग्रंथ सुमारे पाऊणशे वर्षापूर्वीचे, जुने आहेत, ते दुमिळ होत चालले आहेत. अनेक ग्रंथातील गीता एकत्र करणे हा मूळ उद्देश या प्रकाशनाने सफळ होणार आहे. संस्कृत भाषेचे अभ्यासू विद्यार्थी कमी होत चालले आहेत. त्यामुळे संहिता देऊन आवश्यक तेवढा अर्थ द्यावयाचे ठरविले आहे. त्यामुळे कुतुहलाने वाचक त्याचा आस्वाद घेऊ शकतील.

या उपक्रमात सर्व गीताप्रेमींचा सहभाग मंडळाला कार्यप्रवण करणारा ठरेल. गीताधर्म मंडळ, पुणे या संस्थेस मिळणारी देणगी आयकर कायदा कलम ८०-जी प्रमाणे सवलतीस पात्र आहे. रू. २००० देणगी देणाऱ्यास प्रसिध्द दोन खंड व पुढे होणारे १० खंड मंडळाच्या वतीने भेट म्हणून दिले जातील.

आपली रक्कम बँक ड्राफ्टद्वारे 'गीताधर्म मंडळ, विविधा गीता प्रकल्प' या नावाने ११४१ सदाशिव (पेरुगेट जवळ), पुणे ४११०३०. फोन -४४७६४९१; या पत्यावर पाठवावी. ★★★

Marathe Pratishthan

# विवाह सहाय्य

*हितगुजच्या वाचकांनी त्यांच्या कुटुंबातील अथवा नात्यांतील किंवा परिचयातील मुला-मुलींची माहिती 'विवाह सहाय्य' या सदरांत प्रसिद्धीसाठी पाठवावी.*

*बहुसंख्य वाचक हे कपिगोत्रीच असणार. त्यामुळे कपिगोत्र नसणाऱ्या मुलां-मुलींची माहिती पाठविण्यात मराठ्यांच्या माहेरवाशिणी फार मोलाचे कार्य करू शकतील.*

*कुलबांधवांकडून आलेली माहिती खाली दिली आहे. इच्छुकांनी संबंधितांशी परस्पर संपर्क साधावा. - संपादक.*

**क्र. १०/२००० वर** विनित विजय फळणीकर, जन्म १३.४.१९७३, उंची १६५ से.मी., रक्त गट ARH+ve, कऱ्हाडे ब्राह्मण, CA, CS च्या दुसऱ्या पार्टला बसला आहे. सिबा स्पेशालिटी मध्ये (गोरेगांव, मुंबई) मॅनेजर फायनान्स. **अपेक्षा** - शक्यतो कऱ्हाडे ब्राह्मण, CA असावी, नोकरी हवी, उंची १६०-१६२ से.मी. **संपर्क** - श्री. विजय पुरुषोत्तम फळणीकर, १२८, श्री निवास, हिंदु कॉलनी, ५वी गल्ली, दादर, मुंबई ४०० ०१४. फोन - ४१४३२६७.

**क्र. ११/२००० वर** महेशकुमार सुधाकर खांबेटे, गोत्र - कपी, कोकणस्थ, जन्म २८.९.१९७३, M.Sc. Agri. इंडोफील केमिकल्स कंपनीत डेव्हलपमेंट ऑफिसर, ७००० रु. मा. प्राप्ती, उंची ५'५'', रंग - गोरा, रक्तगट - BRH+ve, मुलाचे आईवडील निवृत्त शिक्षक असून दापोलीला राहतात. एक लहान बहीण M.A. करत आहे. मुलगा पुण्यात असून भाड्याच्या फ्लॅटमध्ये राहतो. मुलाची आत्या पुण्यात असते त्यामुळे **संपर्कासाठी आत्याचा पत्ता** - श्री. सुनील रघुनाथ फडके B II/6 काकडे पार्क, चिंचवड गांव, पुणे ४११०३३ फोन - ७४५२७१८. **अपेक्षा** - कोणत्याही ब्राह्मण शाखेची व नोकरी करणारी पाहिजे.

**क्र. १२/२००० वर** हेमंत विजय पारखी, जन्म - ३.९.१९७५, देशस्थ ऋग्वेदी, गोत्र - वसिष्ठ, शिक्षण - Metallurgy मधील डिप्लोमा, नोकरी - Pegasus Castalloy Ltd. कंपनीत Engineer Incharge, पगार - ७००० रु., उंची - ५'४'' गहूवर्ण. रक्तगट - O+ve, मुलाला आईवडील नाहीत. (आई नुकतीच वारली त्यामुळे वर्षाच्या आत लग्न करायचे आहे) १ विवाहित बहीण आहे. मुलाचे भोरला स्वतःचे घर आहे व पुण्यात भाड्याच्या फ्लॅटमधे राहतो. **अपेक्षा** - नोकरीची अट नाही. घराची सर्व जबाबदारी स्वतंत्रपणे पेलू शकणारी व चांगला स्वयंपाक करता येणारी, **संपर्क - मुलाचे मामा** - डॉ. उदय नारायण पेंडसे, 'गुरुप्रसाद', नवी अळी, मु. पो. भोर, जिल्हा - पुणे, पिनकोड ४१२२०६. फोन - २२८४३, २३०५५, पत्रिका पहायची आहे.

**क्र. १३/२००० वर** सिध्दार्थ रघुनाथ जोशी, कोकणस्थ, गोत्र - शांडिल्य, जन्म - 13.7.1977, B.A., D.B.M., नोकरी - पी.एम.टी. मशीन टूल्स पिंपरी येथे पर्चेस ऑफिसर, उंची - ५'१०'', गहूवर्ण, पगार - ७००० रु., सुदृढ, आई वडील व एक विवाहित बहीण, स्वतःचे घर, वडीलही त्याच्याच कंपनीत सुपरवायझर आहेत. **अपेक्षा** - पदवीधर, नोकरी करणारी, उंची ५'४'' पर्यंत. कोणत्याही ब्राह्मण शाखेची, **संपर्क** - श्री. रघुनाथ नारायण जोशी, A3, फ्लॅट नं. २७, निंबजनगर, आनंदनगर, सिंहगड रोड, पुणे ४११०५१ फोन - ४३५८५०६.

**क्र. १४/२००० वर** केदार शरद कुलकर्णी, देशस्थ ऋग्वेदी, वय २७, D.M.E. दमण-गुजराथ येथे खाजगी कंपनीत इंजिनियर, पगार - १०,००० रु., ५'३'', निमगोरा, सडपातळ, मुलाला आई वडील, एक विवाहित भाऊ व एक बहीण (विवाहित) आहे. सर्वजण मिरजेला असतात. मुलगा नोकरीनिमित्त एकटाच दमणला असतो. **अपेक्षा** - पदवीधर, गोरी, दमणला राहण्याची तयारी असावी, कोणत्याही ब्राह्मण पोटशाखेची चालेल. **मिरजेचा पत्ता** - श्री. शरद गजानन कुलकर्णी, गोरे मंगल कार्यालयासमोर, ब्राह्मणपुरी, गांवभाग, मु. पो. मिरज, जिल्हा - सांगली. **मुलाच्या मावशीचा पुण्यातील फोन नंबर** - सौ. गोसावी ५४६७३४७.

**क्र. १५/२००० वर** सारंग सुधीर भट, कोकणस्थ, जन्म - १२.३.१९७२ गोत्र - काश्यप, १०वी, केन स्टार कंपनी येथे डेमॉनस्ट्रेशन करतो, पगार - २,५००रु. ५'६'' सडपातळ, आई घरगुती व्यवसाय करते. वडील रेल्वेतून निवृत्त, लहान भाऊ खाजगी कंपनीत नोकरी, **अपेक्षा** - घरगुती व्यवसायाची आवड असणारी. **पत्ता** - श्री. सुधीर पुरुषोत्तम भट, बांदल कॉम्प्लेक्स, बिल्डींग नं. ६, फ्लॅट नं. २०, पौंड रोड, पुणे ४११०२९. फोन - ५२८३७४०.

**क्र. १६/२००० वर** धनंजय नारायण कार्लेकर, जन्म - २४.१२.१९७२, गोत्र - वासिष्ठ, कोकणस्थ, १२वी कॉमर्स, पौरोहित्याचा व्यवसाय, पगार - ५०००रु. उंची ५'६'', गहूवर्ण, सडपातळ. **अपेक्षा** - देवाधर्माची आवड व माहिती असणारी. मुलाचे आईवडील त्र्यंबकेश्वर येथे राहतात. २ बहिणी विवाहित. मुलगा पुण्यात असतो. स्वतःचा फ्लॅट आहे. चश्मा आहे. **संपर्कासाठी स्नेही व शेजारी राहणारे श्री. सुधीर भट** यांच्याशी संपर्क साधावा. **पत्ता** - क्र. १५/२०००चाच आहे.

**क्र. १७/२००० वर** मंदार मनोहर केळकर, गोत्र - शांडिल्य. जन्म - २१.१.१९७४, B.E. Electronics, व्होल्टा इंडिया कं. पुणे येथे सिनीयर इंजिनिअर, पगार - १६,०००रु., ५'५'' गोरा, सपोर्ट आईवडील व १ लहान भाऊ, भिलाईला असतात. पुण्यात मुलगा भाड्याचा फ्लॅट घेऊन रहात आहे. **अपेक्षा** - मुलगी उच्चशिक्षित असावी. **संपर्क** - M.G. केळकर, १४ बी, गल्ली नं. २६, सेक्टर १०, भिलाई, मध्यप्रदेश ४९०००६.

**क्र. १८/२००० वर** योगेश हरिभाऊ कुलकर्णी, गोत्र - जामदग्नी, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण,

Marathe Pratishthan

जन्म २७.३.१९७३, B.E. (Mech) M.S. (Mech) U.S.A. G.S.S. Ltd. पुणे येथील कंपनीत सिनीयर सॉफ्टवेअर इंजिनिअर आहे. पगार - ३०,०००रु., ६'१'', उजळ रंग, सुदृढ, रक्त गट A+ve, आईवडील आहेत. एकुलता एक मुलगा. **अपेक्षा** - B.E. किंवा M.C.M. किंवा कॉम्प्युटरमधील उच्चशिक्षित असावी. **संपर्क** - हरिभाऊ रामचंद्र कुलकर्णी, ६९३ सदाशिव पेठ, माधव स्मृती, कुमठेकर मार्ग, चितळे सदन समोर, पुणे ४११०३०. फोन - ४४५०१४३.

**क्र. १९/२००० वर** मिलिंद प्रभाकर पेंडसे, गोत्र - जामदग्नी, कोब्रा, जन्म -.७.९.१९६८, M.Com., G.DCA, DPM व MPM चालू. मर्सिडीझ बेंझ या जर्मन कंपनीत मॅनेजर. पगार - १६,०००, ५'२'' निमगोरा, रक्त गट B+ve, आईवडील व १ लहान भाऊ नोकरी करतो. **संपर्क** - प्रभाकर गणेश पेंडसे, १४२४ सदाशिव पेठ, काशिनाथ स्मृती अपार्टमेंट, खजिना विहीर रस्ता, पुणे ४११०३०. फोन - ४४७०७६९.

**क्र. २०/२००० वधू** कु. अनुश्री सुनील थिटे. गोत्र - काश्यप, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, जन्म - १८.१२.१९७७, B. E. Production, टेल्कोमधे इंजिनिअर, पगार - १०,०००रु., ५'४'' सडपातळ निमगोरी, **अपेक्षा** - इंजिनिअरींगमधील उच्च शिक्षित, परदेशी राहण्याची तयारी आहे. मुलीला आई वडील, आजी आजोबा, १ लहान बहीण व १ भाऊ आहे. दोघेही शिकत आहेत. **संपर्क** - श्री. सुनिल वसंत थिटे, २४३ सहकार नगर नं. १, पंकज सोसायटी, आसरा बंगला, पुणे ४११००९. फोन - ४२२६७११.

**क्र. २१/२००० वधू** कु. वृंदा गोविंद कुलकर्णी. गोत्र - पाराशर, देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण, जन्म - २२.६.१९७६, ५'३'' गोरीपान, सडपातळ, A+ve, कॉंटॅक्ट लेन्सेस वापरते, B.E. (Eletro & Telecom) Electronica Machine Tools Pvt. Ltd. मधे ट्रेनी इंजिनिअर, ५,०००रु., **अपेक्षा** - इंजिनिअर, C.A. किंवा डॉक्टर चालेल. मुलीला आईवडील, २ विवाहित बहीणी व १ लहान बहीण आहे. **संपर्क** - श्री. गोविंद चिंतामण कुलकर्णी, A ३/१०, चिंतामणीनगर, भाग ३, बिबवेवाडी, पुणे ४११०३७.

**क्र. २२/२००० वर** संतोष सुधाकर पेठे, जन्म ७.८.१९७१, उंची - ५'-११'', कोकणस्थ, गोत्र - वासिष्ठ, नोकरी - ह्यूजेस टेलिकॉम, पगार - सुमारे १७,००० रु., शिक्षण - बी.कॉम, आई, वडील, १ विवाहित बहीण, **अपेक्षा** - कोणत्याही ब्राह्मण पोटजातीतील, पत्रिका बघण्याची अट नाही, नोकरी करणारी, उंची - अनुरूप, **संपर्क** - सुधाकर सदाशिव पेठे, दळवी वाडी, Off आरे रोड, गोरेगांव (पूर्व), मुंबई -४०० ०६३. दूरध्वनी - ८७४२४७४. (गीता सुधाकर पेठे, गोरेगांव, मुंबई, वामन गोविंद पृ. ७० यांची मुलगी, यांचे मार्फत)

**क्र. २३/२००० वर** यशवंत सीताराम मराठे, कपि गोत्री को ब्राह्मण, बी.कॉम, उंची - ५'-६'', घरचा शेती व डेअरी व्यवसाय पहातो, टि.व्ही., फ्रीज, गॅस, नळपाणी (विहिरीवर पंप बसवून), टेलिफोन या सर्व सुविधा, आई-वडील, धाकटी बहीण विवाहित पुण्यात, धाकटा भाऊ M.B.B.S. (गोव्यात), **अपेक्षा** - स्वजातीय, शक्यतो पदवीधर, उंची ५'-२'', दरम्यान, पत्रिका बघणे आहे. मंगळ नसावा. शेती-बागयतीची आवड/सवय असणारीस अग्रक्रम, **संपर्क** - (१) सीताराम यशवंत मराठे, मु. बिंबल, पो. खातोडे-वाळपई, गोवा ४०३ ५०६. (फोन - ०८३२-३७८१२५) (२) लक्ष्मण शंकर मराठे (मुलाचे काका) अ-२३, सुयोग सोसायटी, मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०० ०८१. (फोन - ०२२-५६८०१०४) (लक्ष्मण शंकर, ५२०, हितगुज संपादक, यांचे मार्फत)

**क्र. २४/२००० वर** प्रशांत श्रीकृष्ण मनपाठक, जन्म - ५.१०.१९७३, वत्स गोत्र, ५'-७'', बी.कॉम, व कॉम्प्युटर डिप्लोमा (हार्डवेअर). एका कॉम्प्युटर कंपनीत नोकरी, पगार - ६००० रु., सडपातळ, गोरा, देशस्थ, शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण, मुलाला आईवडील आहेत. एकुलता एक. **अपेक्षा** - पदवीधर, कोणत्याही ब्राह्मण शाखेची, शक्यतो नोकरी करणारी, **संपर्क** - श्रीकृष्ण काशिनाथ मनपाठक, १२०६/३२ म्युन्सिपल कॉलनी, कामत हॉटेल लेन, संट्रल पार्क समोर, संभाजी पार्क समोर, डेक्कन जिमखाना, पुणे - ४११ ००४. (फोन - ५५३०३२९.) (सौ. नीलांबरी रमेश पृ. २८० यांचे मार्फत)

**क्र. २५/२००० वर** प्रसाद मनोहर हर्डीकर, ७३चा जन्म, B.A.M.S., ५'-१०'', डॉक्टरी व्यवसाय, मा. प्राप्ती - ८ ते १० हजार, कोकणस्थ ब्राह्मण, आई-वडील, १ विवाहित बहीण, १ लहान भाऊ LLB करतोय, स्वतःचे कोकणात घर, कलमाची बाग, नारळ, पोफळीची झाडे व स्वतःचा ट्रक आहे, **अपेक्षा** - कोकणात राजापूर (कोंड्ये) येथे कायम राहणारी, डॉक्टर किंवा पदवीधर, **संपर्क** - श्री. मनोहर हर्डीकर, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, मु. पो. कोंड्ये, (फोन - कोड - ०२३५३, घरचा २११४०, दवाखाना - २१२५५) (सौ. नीलांबरी रमेश पृ. २८० यांचे मार्फत)

**क्र. २६/२००० वर** संतोष दिनकर परांजपे, १०.१०.१९७०, गोत्र-विष्णुवृद्ध, कोकणस्थ ब्राह्मण, उंची ५'-४'', सुदृढ, गोरा, १२वी सायन्स नंतर ३ वर्षाचा पंट टेक्नॉलाजीचा डिप्लोमा वसई येथे क्लासिक स्टाईल्स प्रा. लि. कंपनीत केमिस्ट लॅब इनचार्ज, पगार - ६००० रु., मुलाला आई-वडील, १ भाऊ व १ बहीण असून दोघेही विवाहित आहेत. **अपेक्षा** - पदवीधर, शक्यतो नोकरी करणारी व बाहेर गावी राहण्याची तयारी असलेली, **संपर्क** - दिनकर विष्णू मराठे, ६४८ सदाशिव पेठ, कुमठेकर रोड, सावन शेजारी, पुणे - ४११ ०३०. (फोन - ४४८३६१९)

**क्र. २७/२००० वधू** कु. उल्का रमेश खांबेटे, जन्म - १९.५.१९७७, कोकणस्थ ब्राह्मण, गोत्र - कपी, ५'-२'', देवगण, वृषभ रास, १०वी नंतर होमसायन्सचा ५ वर्षाचा डिग्री कोर्स व २ वर्षाचा होमिओपॅथी कोर्स, मध्यम बांधा, निमगोरा वर्ण, O+ve रक्तगट, मुलीला आई-वडील, १ विवाहित बहीण व लहान भाऊ शिकत आहे. **अपेक्षा** - पदवीधर, चांगली व निश्चित नोकरी, कोणतीही ब्राह्मण पोटशाखा, निर्व्यसनी व माणसे असलेले घर, **संपर्क** - श्री. रमेश केशव खांबेटे,



Marathe Pratishthan

**Self-Improvement**

★ Man gets and forgets,
God gives and forgives.

★ When you speak the truth,
you don't have to remember it.

४९२ शनिवार पेठ, शनिवार पेठ पोस्ट ऑफिसच्या वर, पुणे ३०. (फोन - ४४८३६६२) (सौ. नीलांबर रमेश, पृ. २८०, यांचेमार्फत)

क्र. २८/२००० वधू कु. सुवर्णा गणेश पारखी, जन्म - २६.२.१९७८, देशस्थ ऋग्वेदी, गोत्र - वसिष्ठ, B.Com., M.Com व D.C.A. चालू, नोकरी - नवीन प्रकाशन, DTP ऑपरेटर (पार्ट टाईम), पगार - १००० रु., उंची ५'-३'', सडपातळ, निमगोरी, चष्मा आहे (०.५ नंबर), आई-वडील व १ विवाहित बहीण आहे, **अपेक्षा** - कोणतीही ब्राह्मण शाखा, नोकरी किंवा व्यवसाय, **संपर्क** - गणेश धुंडिराज पारखी, १३९१ शुक्रवार पेठ, नवा विष्णू चौक, संगम साडी सेंटर शेजारी, बाजीराव रोड, पुणे -२ (फोन - ४४९३८८२) (सौ. नीलांबर रमेश, पृ. २८०, यांचेमार्फत) ★★★

**एकमेकां साह्य करू**

**निराधार ब्राम्हण बाईला आधार**

**(शक्यतो मराठे कुटुंबीय)**

ठाणे येथील कुलभगिनी श्रीमती जयश्री जगन्नाथ (पृ. ३७१) यांचे पति जगन्नाथ दामोदर यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना मूल बाळ नाही. त्या एकट्याच असतात. त्यांचे वय ५८ असून प्रकृती निरोगी आहे.

त्यांना सोबत म्हणून त्यांच्याबरोबर कुटुंबियाप्रमाणे राहून घरकाम करणारी शक्यतो मराठे परिवारातली, निराधार/विनापाश ब्राम्हण सहचरी हवी आहे. वय ४०-४५ च्या पुढे नसावे. तिची पूर्ण आर्थिक जबाबदारी जयश्रीबाई घेतील. संपर्कासाठी पत्ता :- श्रीमती जयश्री जगन्नाथ मराठे, लक्ष्मीनारायण सोसायटी, लालबहादूर शास्त्री मार्ग, रेडक्रॉस भवनच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.), ४०० ६०२. (फोन ०२२-५३०४०८१).

# किस्सा लाल फितीचा

- **अनंत सदाशिव** (पृ. ३६४), मुलुंड, मुंबई

***आचार्य अत्रे सांगत की मी दोनच शक्ती मानतो. एक परमेश्वर आणि दुसरा पत्रकार. गोविंदराव तळवलकरांसारख्या अभ्यासू, साक्षेपी संपादकांबरोबर 'महाराष्ट्र टाईम्स'मधे सहसंपादक म्हणून प्रदीर्घ अनुभव घेतलेले 'जाणते' पत्रकार अनंत सदाशिव यांच्याकडे रंजक, थरारक, उद्‌बोधक अशा आठवणींचा अनमोल खजिना आहे.***

***त्यांचा हा खजिना थोडाथोडा लुटून कुलबांधवांना खुला करण्याचा माझा हट्ट, प्रकृतीच्या अडचणी असूनहि त्यांनी मान्य केला हे आपणा सर्वांचेच भाग्य.***

***वानगीदाखल हा सरकारी लालफितीचा अजब किस्सा! - संपादक***

सरकारी यंत्रणेतील लाल फितीचा कारभार ही काही नवीन बाब नाही. पण ही दप्तर दिरंगाई किंवा बेफिकिरी कोणत्या थराला जाऊ शकते याची ही सुरस कहाणी.

साधारणपणे १९५३-५४ सालातील हकीकत असावी. त्या वर्षापासून विक्रीकराची आकारणी करण्याचे तेव्हाच्या मुंबई सरकारने प्रथमच ठरविले व त्यासंबंधीचे विधेयक विधानसभेत मांडले. विक्रीकराची संकल्पना नवीनच होती आणि अपेक्षेप्रमाणे विरोधी पक्षाच्या सदस्यांनी तिला कडाडून विरोध केला व हे विधेयक दोन्ही सभागृहांच्या संयुक्त चिकित्सासमितीकडे पाठवण्याचा आग्रह धरला. सरकारची त्याला तयारी होतीच. कारण या कराच्या आवाक्याबद्दल मंत्रिमंडळही साशंक असल्याची चिन्हे होती. रीतीप्रमाणे विधेयक चिकित्सा समितीकडे पाठवण्याचा ठराव झाला. समितीवरील सदस्यांची नावे निश्चित झाली.

या यादीत एक नाव श्री. एम. के. देशपांडे यांचे होते. हे श्री. देशपांडे सर्वोदयी कार्यकर्ते राजकरणापासून खरे तर अलिप्त. पण निष्ठावान कार्यकर्त्यांना निवडून देण्याच्या स्वातंत्र्यानंतरच्या सुरवातीच्या प्रथेप्रमाणे ते बोरिवलीहून विधानसभेवर निवडून गेले होते. कालांतराने चिकित्सा समितीचा अहवाल झाला व तो अर्थमंत्र्यांनी सभागृहात सादर केला. त्याबरोबर विरोधी पक्षाचे श्री. तुळशीदास जाधव ताडकन उठले आणि त्यांनी असे काही एक निवेदन केले की सारे सभागृह अवाक झाले!

श्री. जाधव काय म्हणाले? त्यांनी सांगितले की आमदार एम. के. देशपांडे यांची चिकित्सा समितीवर नेमणूक करण्याचे ठरले असताना दुसऱ्याच कोणा एम. के. देशपांडे यांनी समितीवर काम केले व तिच्या अहवालावर सहीही केली. हे एम. के. देशपांडे कोण, तर पुण्याच्या प्रसिध्द शिक्षण क्लासेसचे चालक मा. का. ऊर्फ एम. के. देशपांडे! विक्रीकराशी आपला काय संबंध, असा विचारही त्यांच्या मनाला शिवला नाही. विशेष म्हणजे ते विधानसभेचे सभासदहि नव्हते!

हे घडले कसे - तर विधान सभेच्या सचिवालयातील कोणा अधिकाऱ्याने बोरिवलीच्या एम. के. देशपांडे यांना चिकित्सा समितीवरील नेमणुकीचे पत्र पाठवण्याऐवजी पुण्याच्या एम. के. देशपांडे यांना पाठवले. सारा लाल फितीचा कारभार. त्यावेळी शासकीय पत्रव्यवहार इंग्रजीतून चालत असे.

तेव्हाच्या अर्थमंत्र्यांनी या प्रकाराची चौकशी करण्याचे आश्वासन दिले, पण त्यातून काही निष्पन्न झाले नाही हे सांगणे नकोच. ★★★

---

***केवलानंद सरस्वतीस्वामी पृष्ठ ७ वरून -***

विचारांचा प्रसार केला. काळाशी सुसंगत निर्णय देण्यासाठी धर्म-निर्णय मंडळाची स्थापना केली. नारायणशास्त्री यांनी १९३१ साली संन्यास घेऊन 'स्वामी केवलानंद' असे नाव घेतले. सोमनाथाच्या ज्योतिर्लिंगाची पुन्हा प्राणप्रतिष्ठा करायला सनातनी ब्राह्मणांनी नकार दिल्यावर अशी प्राणप्रतिष्ठा करणे धर्माला मान्य असल्याचा निर्णय नारायणशास्त्री यांनी दिला. त्यांचे पट्टशिष्य तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी पौरोहित्य करून हा मंगल प्रसंग साजरा केला. (साभार - वि. गो. कुलकर्णी, लोकसत्ता, मुंबई, २-१-२०००) ★★★

प्रेषक - **माधव वासुदेव** (पृ. ३८६), पुणे



Marathe Pratishthan

# चाफा

**- श्रुती करमरकर** (लक्ष्मण शंकर, पृ. ५२० यांची मुलगी), बदलापूर

***मुलुंड येथील 'नागरिक दिवाळी २०००' मधील 'चाफा' पाहून (पक्षी वाचून) काहींना दुर्गा भागवतांच्या 'ऋतुचक्र'ची आठवण झाली, तर कांहीना अनंत काणेकरांच्या 'इंद्रधनुष्या'ची. नागरिकचे संपादक माझे मित्र माधव शिरवळकर यांची परवानगी गृहीत धरून 'चाफा' हितगुजमधे साभार समाविष्ट केला आहे. - संपादक***

आज पहाता पहाता ओंजळ भरून गेली होती सोनपिवळ्या सुगंधानी! फार नाही, जेमतेम पाच-सहा महिन्यांपूर्वी तर यातली बंद ओठांची एखाद-दुसरी कळीसुध्दा आनंदाश्चर्याची धनी असायची. इतक्यात मधे फक्त पंचवीस-तीस सरींचा पंधरवडाच गेला होता. मागच्या पावसाळ्यात हे गुडघ्याएवढं रोप रुजवतांना, या अपूर्वाईच्या राजस फुलाचं एक शीतल झाड माझ्या दारी असावं, एवढंच तर अपेक्षित होतं. या भरभरून वाहणाऱ्या गंधश्रीमंतीची एवढया लवकर अपेक्षाही नव्हती.

आधीच माळावरचा मुरमाड मातीच्या वैभवाची परिसीमा म्हणजे घाणेरीच्या कुटुंबातली निळसर रंगाच्या किरटया फुलांची झुडपं. कुठेतरी अधून-मधून बदल म्हणून थोडी काटे-रिंगणी नाहीतर कारिटाचे वेल. त्यातच घर बांधण्याच्या खटाटोपात अवती-भवती वाळू-सिमेंटचा चांगलाच पसारा झाला होता. फुलपाखरांनी-पक्ष्यांनी यावं, रहावं असं कुठेच काही नव्हतं. म्हशींच्या चराऊ माळावर त्यांच्या मागून येणारे गाय-बगळे आणि कीड-मुंग्या टिपणाऱ्या चिमण्या, हाच काय तो शेजार. हा शेजार संपन्न करायचा असेल तर हव्याशा वाटणाऱ्या पाहुण्यांजोगी जागा तयार करायला हवी. चार झाडं रुजवायची तर आधी इमारती सामानाचं डबर गोळा करून त्याखाली दडपलेली माती मोकळी करायला हवी. नाही तर मुळं पकडणार कशाला आणि मुळांनाच घट्ट पकड नसेल तर आकाश कशावर तोलणार?

मग काय, पुन्हा एकदा नकाशे रेखाटनांना ऊत आला. झाडं कोणकोणती हवीत? मग ज्याच्या-त्याच्या विस्ताराप्रमाणे एकमेकांतलं अंतर किती? घराच्या पायापासून आणि हो, खिडक्यांच्या काचांपासून आंबा-जांभूळ-पेरु वगैरेचं सुरक्षित अंतर किती? घराच्या पुढे काय-मागे काय-कुंपणाला काय? एकामागून एक योजना बनत गेल्या. घर बांधून झालं असं जाहीर करून गॅरेजमध्ये ढकलेली कुदळ-फावडी परत बाहेर निघाली. घराभोवतालचा तो कोरभर तुकडा साफसूफ करुन चांगलं अंगड-टोपडं घालून निसर्गाचा निसर्गाला परत करण्याचा उद्योग आम्ही सुरू केला. चाफा माझ्या घरी आला अशाच एका संध्याकाळी.

दिवस कलण्याच्या मार्गावर होता. मध्यमवर्गीय कमरांना न झेपणारी कामं करणारे दोन गडी सुटी करून घरी जायला निघाले होते. इतक्यात रोपवाटिकेतून मागवलेल्या झाडांची गाडी हजर झाली. कुंपणासाठी सुरू; फळांसाठी नारळ, जाम, चिकू, पेरु; इतर बारीकसारीक बरेच काही आणि निव्वळ हौसेसाठी चाफा! आलेल्या झाडांच्या किंमतीचा कागद वाचतांना घरमालकांच्या भुवया किंचित वर चढल्या अन् मला येतांना पाहून बिलाचा कागद चपळाईने खिशात अदृश्य झाला. "अस्सं! एकंदर या हौसेचं मोल जरा जास्तच होतंय तर!" मी अंदाज बांधला.

माझा तर्क खरा होता. त्या चिमुरडया रोपाची बरोबरी सुरुच्या अख्ख्या रांगेशी होत होती. "अरेच्या! एवढं नवल-विशेषाचं आहे तरी काय या रोपात?" मग चाफ्यांच्या त्या रोपट्याचं जरा जास्तच काळजीपूर्वक निरीक्षण झालं. तजेलदार, तरतरीत शेंडा, बोटभर जाडीच्या मूळ खोडाच्या दोन मुख्य फाट्यांना सर्व बाजूंनी नीट तोल साधत फुटलेले चार-पाच प्रमाणशीर फुटवे, आंब्यागत आकाराची पण कडांना नागमोडी वळलेली पाने आणि हो, त्यापैकी एका काडीवर एक अर्धावगुंठित कळीसुध्दा होती! तिच्या जेमतेम दिसणाऱ्या पाकळ्यांच्या हळदी पिवळा रंग रोपाच्या खानदानीपणाची साक्ष देत होता.

जेवणघराच्या खिडकीखालची जागा त्या झाडासाठी निश्चित झाली. तिथला एक खड्डा जाल्या गडयाकडून साग्रसंगीत भरून घेतला. पिशवी हळुवार फाडून मूळ न दुखावता रोप मधोमध लावलं आणि आधारासाठी एक दोन-हात लांब काठीसुध्दा बांधून टाकली. रोप लावल्यावर नवं असतांना जरासुध्दां हलता कामा नये अशी नर्सरीवाल्याची सक्त ताकीदच होती ना! आता पश्चिमेकडून येणाऱ्या वाऱ्याला या भोज्ज्याला शिवूनच घरात शिरावं लागणार होतं. म्हणजेच फुलणाऱ्या प्रत्येक फुलाची वर्दी ऐन जेवणाच्या टेबलावर मिळणार होती. पण त्या कुंडीतल्या गुलाबाएवढया दिसणाऱ्या चाफ्याबद्दल मला का कोण जाणे, फारसा काही गंधविश्वास वाटला नाही. बाजारातून घरी येतांना पिशवीत फळलेली - फुललेली झाडं घरच्या साध्या शेणा-मातीत फारशी काही बहरत नाहीत हा पूर्वानुभव गाठीशी होताच.

दोन दिवसांनी ती विकतची कळी फुलली. तिचं रीतसर कौतुकही झालं. पण ते फूल काही घरचं नव्हतं. त्या पहिल्या फुलाच्या रंग, रूप, सुवासाची तारीफ झाली खरी पण त्यात आपलेपणाची कमतरता होती. जणु ती आमची लेक नव्हे सून होती. त्या कळीच्या उमलण्यानंतर पुढचे महिना-दोन महिने सारं काही 'जैसे थे' च होतं. पण उघडया माळावरचा वेडा वारा आणि मुसळधार पाऊस या दोन्हींना कुशीतल्या काठीच्या आधारावर तोंड देत चाफा तगून राहिला हेच काय थोडं झालं. नव्या गावाशी, नव्या हवेशी, नव्या मातीशी जमवून घेणं त्याला अखेरीस साधलं होतं. दिवाळीपर्यंत त्याच्या उंचीत जवळजवळ अर्ध्या-पाऊण फुटाची भर पडली होती. मग अचानक ठिकठिकाणी जून पानांच्या सांध्यांत लहानगी टोकं उमटली. "हे इथे दिसतंय्....हे जरा मोठं वाटतंय्..... इथेही की काय?"

"कळया की काय?"

"एवढया?छे!छे! पालवीच," अपेक्षाभंगाच्या भीतीने भाग्य नाकारायच्या सावध संवयीने निष्कर्ष काढला.

पण आठवडयातच त्या कळया बोटाच्या पेरांइतक्या दिसू लागल्या. मग सुरू झाला फुलता महिना. रतीब घातल्यागत रोज एक-दोन फुलं उमलू लागली. "आमच्या घरची फुलं! इथेच जन्मून, वाढून उमललेली खरीखुरी आमची फुलं!" मग त्या



Marathe Pratishthan

अपूर्वाईच्या फुलांवर शाळेतल्या बाई आणि खास खास मैत्रिणींची, शेजारणींची नावं पडू लागली.

"बाई, आमच्या घरच्या झाडाचं फूल!"

"पण घर तर नवंच आहे. मग आहे तरी केवढं हे झाड? कमरेएवढं? तरी फुलं येतात? वा! पहायलाच पाहिजे एकदा!"

मग कुणी रसिक-परिचित, अपरिचित-मुद्दाम झाड पहायला येऊ लागले. नवं घर पहायला येणाऱ्यांच्या वर्दळीत फुलं येणारा छोटा चाफा पहायला येणाऱ्या हौशी मंडळींची भर पडली. आम्हीसुध्दा "लेकीने पैकीच्या पैकी मार्क मिळवले" अशासारख्या चालीवर चाफ्याला शाबासक्या मिळवत होतो.

पण थंडी वाढू लागली तसा पहिला बहर ओसरला पानांवरही पिवळसर छटा येऊ लागली. कळ्या संपल्या आणि मुळांशी पाचोळा जमला. दृष्टावलं! काही रोग पडला की काय? नाही-नाही. रिकाम्या काडयांच्या टोकाशी पालवीच्या खुणा दिसत होत्या. "म्हणजे जून पानांचे दिवस सरले होते तर! आत जन्मणारी नवी पूर्ण पिढी कुशीतली एक-एक गंधकुपी जगासाठी उधळून पाचोळा होणार"

उन्हाच्या वाढत्या तडाख्याची मला काळजी पडली. चाफ्यालाही तो चांगलाच जाणवत होता. यथाकाल फुलं फुलु लागली खरी, पण फुलाचा आकार आणि रंग दोन्ही उताराला लागले होते. "चालायचंच! सगळेच दिवस सारखे कसे असणार? आता चाफ्याचं पाणी वाढवायला हवं. वरचे चटके सहन करायला मुळाखाली गारवा जास्त लागणार. घातलेलं निम्म-अधिक पाणी उन्हाने वाळूनच जात होते. झाडाला सावलीही करावी का? पण नकोच. असला दुबळेपणा काय कामाचा? उन्हाळा आहे तर ऊन सोसता यायलाच हवे. कितपत तग धरतोय बघू तर खरं !"

चाफा चिवट ठरला. मोकळ्या माळावर तळपत्या सूर्याखाली अस्तित्व टिकवणं म्हणजे अग्निदिव्यच होतं. पण फुलण्याचा धर्म त्याने सोडला नाही. काळ बदलण्याची तो नेटाने वाट पहात होता.

आता मळभाचे घामट दिवस सुरु झाले. ऋतुबदलाच्या मधला हा गदमदता काळ सुसह्य करायचा असेल तर रिकामपण असता उपयोगी नाही. वाळवणं, साठवणं, लोणची, मसाले कड्या-कोयंडे-झडपा-सुतारकाम, चपला, रेनकोट-छत्र्या, खरेदी-दुरुस्ती, घरगळतीची दुरुस्ती..... यादी जेवढी मोठी तेवढा उन्हाळा चटकन संपतो. शेवटी उशीर किती झाला ते वाट बघायला सुरवात कधीपासून केली त्यावरच तर ठरतं !

उन्हाळी कामांच्या या लांबलचक यादीत आता बागकामाची भर पडली होती. पावसानंतर फुटणाऱ्या नव्या पालवीला जागा करून देण्यासाठी आणि वादळी वाऱ्याकडून होणारी मोड-तोड कमी करण्यासाठी वेड्यावाकड्या वाढलेल्या फांद्या आटोपशीर छाटून टाकल्या. पण चाफ्याला हात लावायला माझं मन होईना. तो सर्व बाजूंनी असा काही प्रमाणशीर वाढला होता की त्याला विद्रुप करणे माझ्याच्याने काही झाले नाही. आधी लावलेला दीड हाती आधार आता त्याला तोकडा पडत होता. तो काढून तिथे एक चांगला मजबूत खांब पुरला आणि चाफ्याची त्याच्याशी पक्की गाठ घालून दिली. शेणखत आणून देणाऱ्या गाडीवानाला तीन-तीनदा बोललेले नवसही एकदाचे फळले. साऱ्या बागेबरोबरच चाफ्याच्या पायागतीही दोन-तीन पाट्यांचा खुराक दडपून झाला. आता मात्र पावसाचीच खोटी होती.

एकीकडे उन्हाचा ताप कमी झाल्यापासून चाफ्याचा हिरवेपणा वाढत चालला होता. एकन्-एक कळी आणि फुटवे मोजत राहण्याची नवलाई कधीच संपली होती. चाफ्याचा विस्तारही आता सहजी मोजदाद करण्यासारखा राहिला नव्हता.

वाट पहायला लावून-लावून अखेर एका संध्याकाळी वाजता-गाजता पहिला पाऊस पडला. सुरवात रोजच्यासारख्या धुळीच्या वावटळीनेच झाली. पण पाहता-पाहता नूर बदला. वाऱ्याचा वेग वाढत गेला. पूर्व क्षितिजावर काळे ढग गोळा होऊ लागले. मातीच्या वासाने डोंगरापलिकडची बातमी आणली म्हणेपर्यंत क्षितिजावर लकाकणारी वीज ऐन डोक्यावर कडाडू लागली. नक्की कुणीकडून धावावं हे न उमगल्यागत वारा उभा-आडवा उधळला होता. चाफ्याच्या झाडाचा तर पार खुळखुळाच झाला होता. वारा येईल तशी मान तुकवण्यापलिकडे दुसरा इलाजच नव्हता. चाफ्याची ती घुसळण पहाण्याचं माझं धाडस संपलं. हा सगळा धुमाकूळ आटोपून सकाळ उजाडली तेव्हा सारं कसं निर्मळ होतं. हो, बागेमध्ये पाच-सहा मोडक्या फांद्या आणि एक सपशेल शरणागत पपईसुध्दा होती. "बरं झालं, चाफ्याचा आधार वेळेवर बदलला !"

पावसाने तासागणिक उगवतीकडे सरकत पूर्ण दिवसाचा ताबा मिळवला, तोपर्यंत चाफ्याच्या भरगच्च पानांतून एखाद-दुसरी कळी फुलायला सुरवातही झाली होती. पाहता पाहता दोनची चार..... चाराची आठ फुलं झाली. फुलं फुलण्याचे विक्रम रोज बनू, रोज मोडू लागले आणि एक दिवस तर चक्क ओंजळ भरून वाहू लागली.

होतं तरी कुठे हे एवढं धन ?

या लहानग्या जिवामध्ये ही एवढी प्रेरणा दडली होती ? देण्याजोगं हे इतकं सारं होत ?

बस्स, भिजणारा स्नेहवर्षाव आणि चेतवणारा ऋतुबदल यांचीच तर खोटी होती.

★★★

**एकमेकां साह्य करू**

**ब्राम्हण मुलाची शिक्षणाची सोय**
**(शक्यतो मराठे कुटुंबीय)**

ठाणे येथील कुलभगिनी श्रीमती जयश्री जगन्नाथ (पृ. ३७१) यांचे पति जगन्नाथ दामोदर यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना मूल बाळ नाही. त्या एकट्याच असतात. त्यांचे वय ५८ असून प्रकृती निरोगी आहे.

त्यांच्या घरी कुटुंबियाप्रमाणे राहून ८वीच्या पुढे शिक्षण घेणाऱ्या एका ब्राम्हण विद्यार्थ्याची (शक्यतो मराठे परिवारांतल्या) राहण्याची व शाळा, कॉलेजच्या पूर्ण शिक्षणाची जबाबदारी समाजऋण फेडण्याच्या भावनेतून श्रीमती जयश्रीबाई घेणार आहेत. मुलगा होतकरू, कष्टाळू, निर्व्यसनी व गरीब कुटुंबांतला असावा. शिक्षण संपल्यानंतर वाटल्यास त्याने आई-वडिलांकडे जावे. संपर्कासाठी पत्ता : श्रीमती जयश्री जगन्नाथ मराठे, लक्ष्मीनारायण सोसायटी, लालबहादूर शास्त्री मार्ग, रेडक्रॉस भवनच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.), ४०० ६०२ (फोन ०२२-५३०४०८१).

Marathe Pratishthan

## हसरे हितगुज — स्त्रियांना अर्धीच फी?

''फाडफाड इंग्रजी शिकण्याचा क्लास- मुली/स्त्रियांना फीमधे अर्धी सवलत'' अशी पाटी बघून रामराव तावातावाने क्लासच्या चालकांना म्हणाले -

''स्त्री-पुरुष समानतेच्या युगांत तुम्ही स्त्रियांना फी मधे अर्धी सवलत कां देता?''

''स्त्रियांना फाडफाड बोलतां येतच असते; फक्त इंग्रजी शिकवावे लागते म्हणून अर्धी फी!''

प्रेषक : **विठ्ठल महादेव**
(पृ. २३५), सांगली.

## या अंकात


१. **कै. सुरेशभाऊ स्मृति निधी - आवाहन** ........ पृ.१
ग. वि. मराठे, कार्योपाध्यक्ष, मराठे प्रतिष्ठान

२. **एकसष्टीचा अंत्यविधी !** ........ पृ.४
गजानन चिंतामण

३. **१८व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तान्त** ........ पृ.५
विनायक केशव

४. **नारायण सदाशिव ऊर्फ केवलानंद सरस्वतीस्वामी** ...... पृ.७
प्रेषक - माधव वासुदेव

५. **गुणवंतांच्या पाठीवर कौतुकाची थाप** ........ पृ.८
मराठे प्रतिष्ठान-गुणवत्ता पारितोषिके १९९९-२०००

६. **जिद्द** ........ पृ.९
विजय अनंत

७. **गीताधर्म मंडळ, पुणे यांचा विविधा गीता प्रकल्प** ...... पृ.१०

८. **किस्सा लाल फितीचा** ........ पृ.१३
अनंत सदाशिव

९. **चाफा** ........ पृ.१४
श्रुती करमरकर

याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.२), **सभासद वृत्त** (पृ.३), **विवाह सहाय्य** (पृ.११), **Self-Improvement** (पृ.२,१३), **एकमेकां साह्य करू** (पृ.१३,१५), आणि **हसरे हितगुज** (पृ.१६) ही नेहमीची सदरे.


**बुक पोस्ट**

प्रति


**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(दू. नं. ४३०२४५३)


Marathe Pratishthan